# कृष्णार्पणमस्तु

**KRISHANARPANMASTU** Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 2 | Marathi Monthly | Thane, Satuarday , 1 August to 31 August-2023 | Pages 16 | Price : 10/-


# जळत्या मणिपूरविषयी अवाक्षरही न काढता, देशाचे पंतप्रधान विदेश दौरे करीत होते!

## मणिपूरच्या घटनेच्या निषेधार्थ 'धर्मराज्य पक्षा'ची ठाण्यात निदर्शने...

**ठाणे (प्रतिनिधी) :** आमचा देश, स्वातंत्र्याचा ७५वा अमृतमहोत्सव साजरा करतोय, ज्याला आम्ही अमृतकाळ म्हणतोय. मात्र, आज देशाची परिस्थिती कशी आहे? ३ मेपासून मणिपूरमध्ये आणि त्याही अगोदर, देशात ज्या घटना घडतायेत, त्या अत्यंत लाजिरवाण्या, माणुसकीला काळिमा फासणाऱ्या व सुसंस्कृत भारतीय नागरिकाला शरमेनं मान खाली घालणाऱ्या आहेत. एकीकडे मणिपूर जळत असताना, दुसरीकडे आमच्या देशाचे पंतप्रधान, मौन बाळगून विदेश दौरे करीत होते! असा जोरदार घणाघात 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, २१ जुलै-२०२३ रोजीच्या संध्याकाळी ठाणेकर नागरिकांशी संवाद साधताना केला. मणिपूरमध्ये दोन महिलांची नग्न धिंड काढून, त्यांच्यावर सामूहिक अत्याचाराची

### राजन राजेंचा, नरेंद्र मोदींवर जोरदार घणाघात

मणिपूर हा भारताचा हिस्सा आहे की नाही? आमचे पंतप्रधान आणि त्यांची नेतेमंडळी मणिपूर पेटलं असतानाही, निवडणुकांच्याच माहोलमध्ये कसे वावरु शकतात? नवीन संसद भवनाच्या उदघाटनाला 'सेंगोल'ची नाटकं चालली असताना, दिल्लीत महिला पहेलवानांना गुरासारखं फरफटत नेत, त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला होता. नेमक्या त्याच सुमारास मणिपूरही जळत होतं, हे विसरू नका. जनता जेवढी शांत बसेल, तेवढ्या या घटना देशात वाढतील आणि त्याचं पाप, आपल्या माथी बसेल, म्हणून मोदी-शाहांची अत्याचारी 'भाजपा'ई राजवट, २०२४च्या लोकसभा निवडणुकीतून उलथून लावा.



अत्यंत घृणास्पद घटना घडली. त्याचा निषेध करण्यासाठी, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे रेल्वे स्थानकाबाहेर निदर्शने करण्यात आली. यावेळी घटनेचा निषेध म्हणून, एका स्वाक्षरी मोहिमेचं आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, निदर्शनापूर्वी, इर्शाळवाडी येथील दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महत्त्वाची बाब म्हणजे, मुसळधार पाऊस असतानाही, ठाणेकर नागरिकांनी, विशेषतः तरुणांनी या निदर्शनाच्या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद दिला.

दरम्यान, ठाणेकर नागरिकांना संबोधित करताना राजन राजे पुढे म्हणाले की, बिल्किस बानो हिच्यावर अत्याचार करणाऱ्यांचा, त्यांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर, १५ ऑगस्ट-२०२२ रोजी सत्कार करणारी औलाद या देशात आहे. काश्मीरच्या कठुआमध्ये आसिफा नावाच्या मुलीवर, देवळाच्या गाभाऱ्यात, सामूहिक बलात्कार होतो. त्यावेळी हरियाणात एक फोन जातो आणि तिथून सांगितलं जातं, मी येईपर्यंत... *(पान क्र. २ वर)*

---

## इर्शाळवाडीसारखी दुर्घटना टाळण्यासाठी, ठाणे शहरातील टेकड्यांवर आणि डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या झोपड्या निष्कासित करुन, तेथील रहिवाशांचे तात्काळ सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी


**ठाणे (प्रतिनिधी) :** सद्यस्थितीत पावसाने अवघ्या महाराष्ट्रात दमदार सुरुवात केलेली आहे. ठाणे, मुंबई आणि कोकणासहित, महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झालेली आहे. दरम्यान, **रायगड जिल्ह्याच्या खालापूर तालुक्यात असलेल्या इर्शाळवाडी येथे, दरड कोसळून २९ ग्रामस्थांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्घटना ताजी असतानाच, याच पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांना पत्र लिहून, ठाणे शहरातील भूस्खलनाचा धोका असलेल्या ठिकाणी तत्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. यामुळे ठाणे शहरातील टेकड्यांवर आणि डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या नागरिकांच्या मनात भीतीचे सावट निर्माण झालेले आहे.** यासंदर्भात, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने दि. ०७ जुलै-२०२३ रोजी, राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह, ठाण्याचे जिल्हाधिकारी, ठाणे महापालिका आयुक्त, वन विभाग, ओवळा-माजिवडा मतदारसंघाचे आमदार प्रताप सरनाईक, मिरा-भाईंदर महापालिका आयुक्त पत्र पाठवून, ठाणे शहरातील काजूपाडा (घोडबंदर रस्ता) येथे डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या अनधिकृत... *(पान क्र. ६ वर)*

---

**अंतरंग**




आताचे तथाकथित राजकीय कार्यकर्ते... खरोखरीच, किती राजकीय आणि किती आर्थिक (पोटार्थी) कार्यकर्ते ???
...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. ३



तू देवाला भेटला आहेस का?'
किरण चव्हाण
पृष्ठ क्र. ७



राजन राजेंना अशीही गुरुदक्षिणा...
पृष्ठ क्र. १४

# आर्थिक पत घसरलेल्या ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासकीय कारभाराची तात्काळ चौकशी करा!

**'धर्मराज्य पक्षा'ची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**


**ठाणे (प्रतिनिधी) : भारतातील पहिल्या क्रमांकाची मानांकन संस्था, अशी ओळख असलेल्या 'क्रिसिल' या संस्थेने आपल्या संकेतस्थळावरुन जाहीर केल्याप्रमाणे, ठाणे महानगरपालिकेची आर्थिक पत घसरलेली असून, महापालिकेचा 'ए-प्लस' असलेला दर्जा आता, 'बी-प्लस' असा घसरला असल्याचे, प्रसिद्धीमाध्यमांतील बातम्यांद्वारे समोर आले आहे. ही बाब करदात्या ठाणेकर नागरिकांसाठी जितकी धक्कादायक आहे, तेवढीच ती लाजिरवाणीदेखील आहे.** दरम्यान, 'क्रिसिल' या संस्थेने, आपल्या संकेतस्थळावरुन प्रकाशित केलेल्या अहवालात स्पष्ट केले आहे की, ठाणे महानगरपालिकेला पत्रव्यवहार, ई-मेल आणि दूरध्वनीद्वारे संपर्क साधूनही, ठाणे महापालिका प्रशासनाने कोणतेही सहकार्य न करता, प्रतिसाद दिला नाही. याच पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीनेदेखील वारंवार पत्रव्यवहार करुन, ठाणे महापालिका प्रशासन प्रत्येकवर्षी लेखापरीक्षण करीत नसल्याबाबत




अवगत करण्यात आलेले असताना, त्याकडेही महापालिकेने सोयीस्कररित्या डोळेझाक केली आहे. **दुर्दैवाची बाब म्हणजे, आजही गेल्या चार वर्षांचे लेखापरीक्षण ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध नाही. ठाणे महापालिका प्रशासनाने, अनेक वर्षे लेखापरीक्षण न करता, एक हजार कोटींचे कर्ज घेण्याचा ठराव एकमताने संमत केला होता, त्यावेळी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने आंदोलन करुन, महापालिकेस कर्ज घेण्यापासून रोखले होते. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे, ज्या ठाणे शहरातून, एकनाथ शिंदे हे, थेट महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचले आहेत, त्याच ठाण्यातील २४ लाख नागरिकांची मान, या घटनेमुळे शरमेने खाली गेली असल्याचे, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविलेल्या पत्रात थेटपणे नमूद करण्यात आले आहे.**

दरम्यान, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, **ठाणे महानगपालिका प्रशासनातील काही भ्रष्ट अधिकारी, स्थानिक नगरसेवक आणि संबंधित ठेकेदार यांनी, विकासकामांच्या नावाखाली सार्वजनिक वाचनालये, डिजिटल दिशादर्शक फलक आणि विरंगुळा कट्टा-ज्येष्ठ नागरिक कट्टा यांच्या माध्यमातून, लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे माहिती अधिकारातून उघड केल्यानंतर, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे शहर संघटक अजय जया यांनी, ठाणे शहरात महाघोटाळ्याचे जाहीर प्रदर्शन आयोजित केले होते. त्यासंदर्भात चौकशी करण्याचे निवेदन देऊनही, महापालिका प्रशासनाने मात्र, या आर्थिक गैरव्यवहाराकडे दुर्लक्ष करीत, त्याला संरक्षण दिले होते.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार, ठाणे महापालिकेने अत्यावश्यक सेवांसाठी तत्पर राहणे बंधनकारक असतानाही, आयुक्तांच्या शासकीय बंगल्यातील स्विमिंग पुलासाठी तब्बल दोन कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला असल्याची आठवण मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात करुन देण्यात आली आहे. तसेच, विकास नियंत्रण नियमानुसार, नागरी सुविधांसाठी बांधण्यात आलेल्या 'ठाणे हेल्थ क्लब' येथील तरणतलावासाठी, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून, अल्पदराने सदस्यत्व घेऊन, सामान्य करदात्या ठाणेकर नागरिकांना, कायदेशीर हक्कापासून दूर ठेवण्यात आले होते. दरम्यान, नवीन ठाणे-जुने ठाणे प्रकल्प, गायमुख चौपाटीच्या सौंदर्यीकरणात झालेला भ्रष्टाचार, ऑक्युपेशन सर्टिफिकेट नसलेले व भर मासुंदा तलावात बांधलेल्या गडकरी रंगायतनच्या दुरुस्तीसाठी, दरवेळी करण्यात येणारा वारेमाप खर्च, या सर्व बाबींमुळेच ठाणे महानगरपालिकेची आर्थिक पत घसरलेली असून, ती कायमस्वरुपी रोखण्यासाठी, ठाणे महानगपालिकेच्या प्रशासकीय कारभाराची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करुन, त्याबाबतचा अहवाल जनतेसाठी प्रकाशित करावा, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविलेल्या पत्राद्वारे केली आहे.

## मणिपूरच्या घटनेच्या निषेधार्थ 'धर्मराज्य पक्षा'ची ठाण्यात निदर्शने... *(पान क्र. १ वरुन)*



त्या मुलीला जिवंत ठेवा... तो नरपशू तिथे पोहोचल्यानंतर, तोदेखील तिच्यावर बलात्कार करतो. मणिपूरमध्येही पोलिसांच्या देखत असं घृणास्पद घडलं. ३ मेपासून आजपर्यंत १८०च्या वर लोक मृत्युमुखी पडलीत. जवळपास २०० ते २५० मंदिरे आणि चर्चेस उध्वस्त करण्यात आलीयेत, ५० ते ६० हजार नागरिक आपली घरं सोडून परागंदा झालीयेत. हे सर्व कोण घडवतंय, कशासाठी घडवतंय? हा देश कुणाचा? हे जाहीरपणे विचारण्यासाठीच, आम्ही 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, आज इथे जमलो आहोत. लोकांना हे सांगायला की, हा देश महात्मा गांधींच्या नावाने ओळखला जातो, मौन बाळगणाऱ्या मोदींच्या नावाने नव्हे. मणिपूरमध्ये माणुसकीला काळिमा फासणारी जी भीषण घटना घडली, त्याविरोधात आवाज उठवलाच पाहिजे! अशा शब्दांत राजन राजे यांनी, आपल्या संतप्त भावना यावेळी व्यक्त केल्या.

दरम्यान, देशाच्या पंतप्रधानांचे कर्तव्य काय; तर, देशात कुठेही जातीय दंगली होणार नाहीत आणि जरी चुकूनही कुठे दंगली झाल्याच तर, त्यावर तात्काळ नियंत्रण आणणं... पण, दुर्दैवाने मणिपूरमध्ये ते झालं नाही. मणिपूर हा भारताचा हिस्सा आहे की नाही? शरीराच्या कोणत्याही भागावर वेदना झाली, जखम झाली तर, आमच्या डोळ्यांत पाणी येतं... मात्र, आमचे पंतप्रधान आणि त्यांची नेतेमंडळी मणिपूर पेटलं असतानाही, निवडणुकांच्याच माहोलमध्ये कसे वावरु शकतात? नवीन संसद भवनाच्या उदघाटनाला 'सेंगोल'ची नाटकं चालली असताना, दिल्लीत महिला पहेलवानांना गुरासारखं फरफटत नेत, त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला होता. नेमक्या त्याच सुमारास मणिपूरही जळत होतं, हे विसरु नका. जनता जेवढी शांत बसेल, तेवढ्या या घटना देशात वाढतील आणि त्याचं पाप, आपल्या माथी बसेल, म्हणून मोदी-शाहांची अत्याचारी 'भाजपा'ई राजवट, २०२४च्या लोकसभा निवडणुकीतून उलथून लावा, असं शेवटी आपल्या भाषणातून राजन राजे यांनी कळकळीचं आवाहन केलं.




# ५० खोके एकदम ओके

*खाऊन खाऊन माजलेत ४० बोके, वरतून म्हणतात सगळंच ओके!*
*बोला, हायेत कुठं ते ५० खोके... डचमळत्या ट्रेनच्या धडाला 'ट्रिपल-इंजिन'चे डोके!*
*'बारामती' वाले के गले पडा, नागपूरकर दूजा,*
*आधी होता 'खरबूजा... मग, 'सरकारपाड्या' टरबूजा!*
*'कले कले'ने नाय, 'किलो किलो'ने वाढणं काय ते थांबेच ना...*
*'दादांची रमी, दिल्लीवाल्या 'जोकर' वाचून काहीकेल्या जुळेच ना!*
*'...गद्दारीचा भोज्या, भोज्यातून 'मंत्रीपद',*
*'आलं आलं जवळ 'बारामती स्टेशन'...*
*'म्होरक्याला लईच आलंय बाय, 'फूल टू टेंशन'...!!!*

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*



*शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने, गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शनिवार, दि ८ जुलै-२०२३ रोजी, शिवसेना शाखा-सावरकर नगर, म्हाडा वसाहत, महात्मा फुले नगर, पाटील वाडी, ठाणे (प.) यांच्यावतीने जेष्ठ नागरिक सन्मान सोहळा आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे उपस्थित होते. त्या प्रसंगीचे छायाचित्र...*



*कळवा-खारेगाव परिसरातील ख्यातनाम समाजसेवक व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर उपाध्यक्ष श्री. अर्जुन पाटील गुरुपौर्णिमेनिमित्त भाईंचे आशिर्वाद घेण्यासाठी त्यांच्या शुभारंभ गृहसंकुलातील निवासस्थानी पोहोचले!*



*"धर्मराज्य पक्षाध्यक्ष राजन राजे यांची गुरुपौर्णिमेनिमित्त साईबाबांच्या मंदिराला भेट!"*

---



**राजन राजे**
**(अध्यक्ष)**


मोदी-शाहांच्या 'भाजपा'ई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुन, अवघ्या कामगार-कर्मचारीवर्गाला, आर्थिक समृध्दीने आश्वस्त करण्याचा आणि त्यांना स्वाभिमानाने जगण्यासाठीचा वसा हाती घेतलेल्या, **'धर्मराज्य पक्ष'प्रणित**

## 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

**या कामगार संघटनेत सामील व्हा !!!**



**महेशसिंग ठाकूर**
(महासचिव)
९७६९५ २५००६



**रमाकांत नेवरेकर**
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७



कार्यालयीन पत्ता : रविदर्शन, तळमजला, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, डीएनएस बँकेच्या मागे, राममारुती क्रॉस रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०

# आजच्या राजकीय-तमाशाच्या पार्श्वभूमीवर ढोबळमानाने लिहिलेल्या खालील सूचनावजा संदेशावर आपली प्रतिक्रिया कळवण्याची वाचकांना नम्र विनंती.....

## आताचे तथाकथित राजकीय कार्यकर्ते... खरोखरीच, किती राजकीय आणि किती आर्थिक (पोटार्थी) कार्यकर्ते ???

खरंतरं राजकीय कार्यकर्ते विशिष्ट राजकीय स्वरुपाच्या विचाराने अथवा धोरणांनी आणि सत्य-नीति-निष्ठेनं प्रेरित होणं अथवा बांधले जाणं अपेक्षित असतं... तरच ते राजकीय कार्यकर्ते!

पण, भांडवलदारांच्या फार मोठ्या पैशाच्या प्रभावाने (काही सन्माननीय अपवाद वगळता) बहुतेक सगळेच पक्ष, कॉर्पोरेटीय धर्तीवर चालवले जाताना दिसतात. शिवाय, त्यापलीकडे जाऊन स्मार्ट कार्यकर्ते खुबीने आपापल्या राजकीय पक्षातल्या पदांचा वापर करुन स्वतःची आर्थिक सोय लावण्यात वाकबगार झालेले असतात. बरेच कार्यकर्ते तर, (हल्ली त्यात काही RTI कार्यकर्त्यांचाही भरणा झालाय) एखाद्या संघटित गुंडटोळ्यांचे सदस्य असल्यागत, तहहयात खंडणी गोळा करत आयुष्य व्यतीत करताना सर्रास दिसतात. उदा. **कुणाच्या कुठल्या व्यावसायिक वा व्यक्तिगत समस्या आपल्या गुंडसेनेच्या व पोलिसदलावरच्या प्रभावाच्या आधारे सोडवून देत (अरुण गवळी किंवा दाऊद यासारख्या गुंडटोळ्या थोड्याफार फरकाने, हे असेच धंदे करत असतात... पण, या पक्षीय गुंडांच्या भाळी 'राजकीय टिळा' लागलेला असल्याने, अगदी सरळसोट गुंड म्हणून समाजात संभावना होऊ शकत नाही, एवढंच), स्वतःसाठी आणि पक्षातील इतर सहकार्यांसाठी बक्कळ कमाई करत असतात. अशा भ्रष्ट, डँबिस कार्यकर्त्यांना कुठलीही नोकरी अथवा व्यवसाय, कष्टपूर्वक करण्याची गरजच शिल्लक रहात नाही आणि म्हणूनच, हे त्यांचं बिनभांडवली, विनाकष्टाचं वैभव पाहून पक्षातल्या मोठ्या पदांसाठी मोठ्या भानगडी, मारामाऱ्या होत रहातात.** अर्थात, मोठ्या पदांमुळे पक्षाकडून मोठी आर्थिक रसद हाताळायला मिळते किंवा आपला राजकीय प्रभाव वाढल्याने, त्याचा वापर करुन नव्याने व्यवसाय करता येतो, अथवा मूळचा असलेला व्यवसाय वाढवताही येतो; तसेच, महापालिकेची वा सरकारी कंत्राटं मिळवता येतात व ती मिळवलेली कंत्राटं स्वतः कुठलीही धडपड, मेहनत न करताच, त्या व्यवसायात पारंगत असलेल्या दुसऱ्या कुणाला तरी देऊन (Subletting) वरची टक्केवारीची मलई अलगद वरचेवर खाता येते... हे आनुषंगिक आर्थिक फायदे वेगळेच!

**स्मार्ट कार्यकर्ते खुबीने आपापल्या राजकीय पक्षातल्या पदांचा वापर करुन स्वतःची आर्थिक सोय लावण्यात वाकबगार झालेले असतात. बरेच कार्यकर्ते तर एखाद्या संघटित गुंडटोळ्यांचे सदस्य असल्यागत, तहहयात खंडणी गोळा करत आयुष्य व्यतीत करताना सर्रास दिसतात.**

**अशा अनेक बाबी आणि इतर गुंतागुंतीच्या ठाशीव संरचना एकाचवेळेस समाजात कार्यरत असतात आणि त्यातूनच, एक आत्यंतिक स्वार्थी, मतलबी, तत्त्वशून्य व गुन्हेगारी स्वरुपाचा एक मोठा 'राजकीय-कोलाहल'च समाजात सदैव मौजूद रहातो... आणि, मग या पक्षाकडून त्यापक्षाकडे (विशेषतः, निवडणुका जवळपास आल्या की...) 'माकडउड्या' मारल्या जातात व त्यावर कसलंच बंधन नसतं. 'हमाम में सब नंगे होते है', या उक्तीनुसार सगळेच प्रस्थापित राजकीय पक्ष, आपापल्या सोयीनुसार याला चांगलंच खतपाणी घालताना दिसत रहातात.**

तेव्हा, नाहीतरी हे राजकीय प्रताप, कुठलाही विधिनिषेध न बाळगता सुरु असतात; तर, त्यांच्यावर 'कायदेशीर चाप' लावायला काय हरकत आहे?

दोन तातडीच्या दुरुस्त्या, 'पक्षांतर बंदी कायद्या'त आम्ही 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन सुचवत आहोत, त्या म्हणजे...

**१) आता सरसकट कुठल्याही राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधीला किंवा अनेक लोकप्रतिनिधींना एकत्रितरित्या वा स्वतंत्रपणे (स्वायत्त स्वराज्य संस्था, विधानसभा-विधानपरिषद अथवा लोकसभा-राज्यसभा) पक्षांतर्गत बंड करुन पक्षापेक्षा वेगळी भूमिका ('मूळ पक्ष आणि त्यांचे लोकप्रतिनिधी', हे पूर्णतः वेगळे गणले गेलेच पाहीजेत) घ्यायची असेल, अथवा 'पक्षबदल किंवा पक्षांतर' करायचंच असेल... तर, ''त्यांच्या एकूण संख्येबाबत कुठलाही निकष न लावता, त्यांना सरळ संबंधित लोकप्रतिनिधीत्वाचा राजीनामा देऊनच, ते करायला कायद्याने बाध्य केलं पाहीजे''** त्यामुळे, निष्कारण देशातील न्यायालये, प्रशासन, प्रसारमाध्यमांचा वगैरे वेळ-संसाधनं व्यर्थ खर्ची पडणं बंद होईल व राज्या-देशामधला प्रासंगिक गडबड-गोंधळ व राजकीय तमाशा खूपच कमी होऊन, सार्वजनिक जीवनात काही एक शिस्त निर्माण होईल.

२) तसेच, राज्यस्तरीय अथवा राष्ट्रीय स्तरावरील 'मान्यताप्राप्त राजकीय पक्षां'च्या घोषित पदाधिकाऱ्यांना 'पक्षबदल अथवा पक्षांतर' करावयाचे असल्यास अथवा स्वतःचा नवा पक्ष तयार करावयाचा असला तरीही; अशा राजकीय व्यक्तिंना ''संयमाचा अथवा निष्क्रिय असा 'शीतलन काळ किंवा उपशमन काळ (Cooling Period)' म्हणून, किमान दोन वर्षे कुठल्याही पक्षात प्रवेश देण्यास, अथवा उघडपणे नव्या पक्षासाठी कार्यरत रहाण्यास कायद्याने बंदी घातली पाहीजे...'' तरच, या देशातल्या 'लोकशाही'च्या नावाखाली सुरु असलेल्या धिंगाण्याला, नंगानाचाला काहीप्रमाणात आळा बसू शकेल.



# बदमाष राजकारण्यांमुळे सडून-नासून गेलेली महाराष्ट्रभूमी...




**आज महाराष्ट्रापुरतं बोलायचं झालं तर, महाराष्ट्रातील सध्याचा सर्वात भ्रष्ट लोकांचा पक्ष कोणता... याचं साधंसरळ उत्तर, 'भारतीय जनता पक्ष' (भ्रष्टाचारी B जोडो J पार्टी P) असं, महाराष्ट्रभरातील शेंबडं पोरंदेखील देईल !!!**

**...म्हणूनच तर, फुटीर अजितदादांचं आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं अभिनंदन करण्यासाठी, कालपरवापर्यंत भ्रष्टाचाराविरोधात नेहमीप्रमाणेच 'सोंगंढोंगं' करत शड्डू ठोकणाऱ्या, भीमगर्जना करणाऱ्या दिल्लीश्वरांच्या तोंडातून अजून तरी 'ब्र' देखील बाहेर पडलेला नाही.**

चला, या निमित्ताने शरद पवारसाहेबांनी एकप्रकारे मा. उद्धवजी ठाकरेसाहेबांना काहीसा दिलेला दोषसुद्धा 'साफ' चुकीचा होतो... हे ही सिध्द झालं, ते फार बरं झालं. शरदराव म्हणाले होते (बहुधा, त्याचा उल्लेख त्यांच्या आत्मचरित्रात देखील आहे) की, ''उद्धवजी मंत्रालयात फार कमी वेळा आले, हे चुकीचं होतं''... याचा गर्भित अर्थ हा होता की, ''त्यामुळेच जणू, शिवसेनेतून शिंदेगटाला फोडणं भाजपाला सोपं गेलं''.

...पण, **या उतार वयात आणि कर्करोगासारखं भयंकर दुखणं अंगावर काढूनदेखील, एखाद्या तरुणाला लाजवण्याएवढ्या उत्साहाने शरद पवार महाराष्ट्रात सतत संचार करत असतानाही (पक्षफुटीनंतर तर, अधिकच जोमाने), त्याच्या पक्षात त्यांच्याच पुतण्याने उभी फूट पाडलीच ना?**

याचाच सरळसोट अर्थ... ही शिवछत्रपती, म. फुले, राजर्षी शाहू महाराज, प्रबोधनकार ठाकरे, प्र.के. अत्रे, एस.एम. जोशी, सेनापती बापट, ना.ग. गोरे, साने गुरुजी, बाबासाहेब आंबेडकर, श्रीपाद अमृत डांगे वगैरे प्रभृतींनी वैचारिक नांगरणी-पेरणी करुन महत्प्रयासाने 'कसलेली' ही 'महाराष्ट्र भूमी'... आता, बदमाष राजकारण्यांमुळे पुरती सडून-नासून गेलेली आहे. तिथे, फडणवीस-शिंदे-अजितदादांसारखेच अतिशय निम्नतम दर्जाचे राज्यकर्तेच शोभून दिसावेत, अशी सध्याची अत्यंत केविलवाणी परिस्थिती आहे!

...आणि, ही दुर्दैवी परिस्थिती बदलण्याचं मोठं काम... आम महाराष्ट्रीय जनतेला येथून पुढील प्रत्येक निवडणुकीतून, **विशेषतः २०२४च्या लोकसभा-निवडणुकीतून, पार पाडावचं लागेल. अन्यथा, ही नरेंद्र मोदी-अमित शाहांनी सगळ्या पक्षातली आरपार 'भ्रष्टाचारी' मंडळी गोळा करुन बनवलेली भाजपाची नवी 'केरी-पॅकर सर्कस' आणि हे त्या सर्कसचे 'मालक'... महाराष्ट्राच्या छाताडावर नाचून, आमचा 'शिवछत्रपतींपासून डांगें'पर्यंत उपरोल्लेखित एकूणएक मंडळींनी आणि संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथांपासून ते संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराजापर्यंत संतांनी (आजच्या लाखो निर्बुद्धांचे कळप बाळगणाऱ्या डॅबिस बुवा, बाबा, बापू, सद्गुरु वगैरेंनी नव्हे) दिलेला 'जाज्वल्य हिंदुत्वा'चा महान वारसा (संघीय-भाजपाई ढोंगी, बनावट, विद्वेषी वारसा नव्हे) त्यांनी निर्माण केलेली महन्मंगल पुण्याई कायमची लयाला जाईल, पूर्णतः नष्ट होईल... तद्नंतर, महाराष्ट्र एका फार मोठ्या कालावधीच्या गुलामगिरीयुक्त अंधारयुगात प्रवेश करेल... सावधान!**

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

---




अमित मालवीयसारख्या सातत्याने खोट्या बातम्या, अफवा पसरविणाऱ्या व जाणिवपूर्वक तद्दन खोटी बदनामी करणाऱ्या विकृत, समाजघातकी प्रवृत्तींना कायमचा कायद्याचा जबरदस्त धाक बसवला गेलाच पाहीजे. दुर्दैवाने काँग्रेसजनांनी 'सत्ता आणि मत्ता' या दोहोंच्या नादाने... जे या प्रवृत्तींकडे दुर्लक्ष केलं, त्यामुळेच त्या देशभर व विदेशात फोफावल्या... निदान, 'उशिरा सुचलेलं शहाणपण' किंवा 'देर से आये, दुरुस्त आये' म्हणून, आतातरी त्यांनी अगदी देशभर सर्वत्र कडक पावलं टाकत, या दुष्टप्रवृत्तींचा, दुष्टचक्राचा कायमचा चोख बंदोबस्त करायलाच हवा, ते तसं करतील, ही अपेक्षा बाळगूया!

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

Tweets Tweets & replies Media



**Rajan Raje - राजन राजे ...** · 1m

तलवारीच्या धाकावर मुस्लिम हिंदुंचं 'धर्मांतर' घडवत आलेत, असा दावा करत मुस्लिमांना पाण्यात पहाणारे भाजपाई-संघीय लोकं...आज देशभर ईडी-आयटी-सीबीआयचं 'पिस्तूल' डोक्यावर लावून विरोधकांचं 'पक्षांतर' घडवतायत!
आत्म्यावर बलात्कार करणाऱ्या या दोन्ही घृणास्पद वृत्ती-प्रवृत्तीत कुठला फरक?

**प्रामुख्याने मराठा, कुणबी, आगरी, कोळी, कराडी, कोष्टी, शिंपी, कुंभार, विणकर, नाभिक, लोहार, भंडारी, माळी, धनगर वगैरे वगैरे बहुजन समाजातील भोळसट-अज्ञानी हिंदू धर्मियांवर आपलं शतकानुशतके असलेलं पूर्वीचं 'वर्णवर्चस्व' (जे 'भारतीय राज्यघटना' अस्तित्वात आल्यानंतर बव्हंशी धोक्यात आलं)... पुन्हा प्रस्थापित करता यावं, केवळ याचं स्वार्थी व नीच उद्देशाने, ''तलवारीच्या धाकावर हिंदुंचं 'धर्मांतर' मुस्लिम घडवत आलेत (जोडीला 'द फेक केरला स्टोरी फेम' 'लव्ह-जिहादच्या राईचा पर्वत करणाऱ्या बनावट आरोळ्या आहेतच), अशा खोट्या हाकाट्या पिटत व अफवांचा बाजार उठवत... मुस्लिमांना कडवा विरोध करणारे, त्यांना पाण्यात पहाणारे तद्दन बोगस-ढोंगी तथाकथित हिंदुत्ववादी 'भाजपाई-संघी'य लोकं... आज देशभर ईडी-आयटी-सीबीआयचं 'पिस्तूल' डोक्यावर लावून विरोधी पक्षीयांचं 'पक्षांतर' घडवताना दिसतायत !!!**

...मग सांगा, आत्म्यावर बलात्कार करणाऱ्या, या दोन्ही घृणास्पद 'वृत्ती-प्रवृत्ती'त कुठला फरक शिल्लक राहीला ???

...तेव्हा, या वर्णवर्चस्ववादी-शोषकवर्गाचा हा डाव, हे षडयंत्र तमाम भारतीय जनतेनं हाणून पाडलं पाहिजे... पण, हे होण्यासाठी बहुजनांनी काही पथ्यं पाळणं आवश्यक आहे. त्यांनी 'मनुस्मृति' जाळण्यापेक्षा मुळातून वाचली पाहीजे; तेव्हाच, त्यांना थेट लिखित स्वरुपात कायदा बनवून बेधडक आपल्यावर पराकोटीचा अन्याय-अत्याचार व शोषण करण्याची व्यवस्था, शेकडो वर्षे कशी लावण्यात आलेली होती... याचं त्यांना नीट आकलन होईल.

तसेच जोडीला, बहुजनसमाजाची दिशाभूल करुन त्यांना 'कर्मकांडा'त अडकविण्यासाठी व त्यातूनच, त्यांना 'षंढ' बनवण्यासाठी, संघर्षापासून दूर नेण्यासाठी... या वर्णवर्चस्ववादी-शोषक वर्गव्यवस्थेने निर्माण केलेल्या बुवा, बापू, बाबा, सद्गुरु वगैरेंच्या सगळ्याच फसव्या धर्मसंप्रदायी बाजारापासून दूर राहीलं पाहीजे. तरच, भविष्यात त्यांना काही आशा शिल्लक आहे.

बदमाष राजकारणी जाणूनबुजून कुठल्या न् कुठल्या (कधि कधि एकाचवेळेस अनेक) धर्मसंप्रदायाशी सलगी राखत, त्यांच्याशी संलग्न राहून अर्थपुरवठा करत रहातात व आपल्यासाठी आपसूकच पंथीय मतांची आयती बेगमी करतात, हे बहुजनांसाठी फारच धोकादायक आहे!

***...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

## इर्शाळवाडीसारखी दुर्घटना टाळण्यासाठी... ...(पान क्र. १ वरुन)




झोपड्यांवर कारवाई करण्याबाबतची मागणी केली होती. सदर पत्र पाठवून, दीड महिना उलटूनदेखील, प्रशासनाने त्यावर अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. **ज्याप्रमाणे इर्शाळवाडीच्या दुर्घटनेत, संपूर्ण गाव क्षणार्धात गडप झाले, त्याचप्रमाणे ठाणे शहरातील टेकड्यांवर आणि डोंगराच्या पायथ्याशी उभारलेल्या झोपड्यादेखील भूस्खलनात उध्वस्त होऊन जीवितहानी होऊ शकते, असे स्पष्टपणे नमूद करीत; दुर्दैवाने, काजूपाडा परिसरातील या झोपड्यांवर भूस्खलन होऊन एखादी दुर्घटना घडल्यास, त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल, असा इशारादेखील 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्राच्या माध्यमातून दिला होता.**

दरम्यान, याच पार्श्वभूमीवर महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले आहे की, ठाणे शहरातील १४ ठिकाणी भूस्खलन होऊन, इर्शाळवाडीसारखी दुर्घटना घडण्याची शक्यता मोठ्याप्रमाणात असून, त्यापैकी ११ ठिकाणे ही, एकट्या कळवा-मुंब्रा परिसरातील आहेत. **धक्कादायक बाब म्हणजे, ठाणे महानगपालिका प्रशासनाने, अशा ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांना केवळ नोटीस बजावण्याचे कर्तव्य पार पाडले असून, तेथील रहिवाशांच्या सुरक्षिततेसंबंधी कोणतीही ठोस पाऊले उचललेली नाहीत. टेकड्यांवर वस्ती असलेली आणि डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या ठिकाणी, अनधिकृत झोपडपट्टी उभारण्यात आलेली असली तरी, तेथील रहिवाशांच्या जीविताला असलेला धोका दुर्लक्षित करण्यासारखा नाही. यामध्ये इंदिरानगर, रामनगर, श्रीनगर, लोकमान्य नगर, डोंगरी पाडा, ओवळा, कळव्यातील शिवशक्ती नगर, घोलाई नगर, वाघोबा नगर, भास्कर नगर, आझाद नगर, गावदेवी मंदिर, केणी नगर, सैनिक नगर, कैलाश नगर या ठिकाणांचा समावेश असून, येथील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.** अशातच ठाणे महानगरपालिका प्रशासनाने, केवळ रहिवाशांना नोटीस बजावण्याचे सोपस्कार पार पाडलेले आहेत. **दरम्यान, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, घोडबंदर रस्त्यावरील काजूपाडा येथील, डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या अनधिकृत झोपड्यांबद्दल पत्रव्यवहार करुनही, संबंधित प्रशासनाकडून, त्यासंदर्भात दाखल घेतली गेलेली नसतानाच, आता ठाणे शहरातील आणखी १४ धोकादायक ठिकाणी, रहिवाशी भीतीच्या सावटाखाली वावरत असल्याची गंभीर बाब उघड झालेली आहे. तरी, यासंदर्भात, योग्य ती कठोर आणि कायदेशीर पाऊले उचलून, टेकड्यांवर आणि डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या झोपड्या निष्कासित करुन, तेथील रहिवाशांचे तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्राच्या शेवटी मुख्यमंत्री, ठाणे जिल्हाधिकारी आणि ठामपा आयुक्तांना पाठविलेल्या पत्रातून केली आहे.**

**अमरिका से होकर मध्यप्रदेश,
प्रधानमंत्री कहीं दूर दूर...
भरी हिंसा के बीच,
राहुल निडर पहुँच गये मणिपूर!
नाप लो उसका सीना,
नापना अगर हो कोई जानता...
रोक सके तो रोक लो,
भय से मुक्त इस इन्सान का रास्ता!!
म. गांधी के रास्तेपर चल पडा,
राहुल बन गया फरिश्ता...
जोडे जो सबको,
बस् अब उस राहुल से वास्ता...
लिख सके तो लिख लो दोस्तों,
२०२४ की नयी दास्ताँ...!!!**

***...राजन राजे***
**(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

# तू देवाला भेटला आहेस का?'



प्रतिप्रश्न करण्याची पद्धत बुद्धापासून सॉक्रेटीसने स्विकारली... प्रतिप्रश्नामुळे प्रश्नकर्त्याशी चर्चा संवादी राहते. त्याला विचार करावा लागतो. प्रश्नाला अचूक प्रतिप्रश्नामुळे जुन्या घट्ट धारणांना झटका बसतो. विचारांची दिशा बदलते आणि नवे स्विकारण्याची तयारी होते.

**बुद्धाचे सर्वात जास्त वादविवाद ब्राह्मणांशी झाले. कारण, 'बुद्ध आणि चार्वाक' हे नास्तिक दर्शन आहेत. तर ब्राह्मणी धर्म आस्तिक दर्शन आहे. देव आणि आत्म्याचं अस्तित्व नाकारल्याने याच विषयांवर ब्राह्मण बुद्धाला अनेक वेळा घेरण्याचा प्रयत्न करत असत. 'आत्मा आणि देव' जगभरात मान्यता पावलेल्या कल्पना आहेत.**

ब्राह्मणाने विचारले, ''आत्मा आणि देव यांचे अस्तित्व तुम्ही का नाकारता?''

बुद्धाने प्रतिप्रश्न केला, ''मी आत्मा आणि देव यांचे अस्तित्व नाकारतो हे कधी म्हटले?''

ब्राह्मण म्हणाला, ''असे मी ऐकले आहे ''

बुद्धाने विचारले, ''मी असे म्हटल्याचे तू स्वत: ऐकले आहेस का?''

ब्राह्मण म्हणाला, ''नाही''.

बुद्धाने उत्तर दिले

''याचा अर्थ मी असे म्हणालो किंवा नाही याबद्दलचे सत्य तुला ठाऊक नाही. कुणी तरी म्हणाले यावर तू विश्वास ठेवला आहेस''.

ब्राह्मण म्हणाला, ''तर मग आत्मा आणि देव आहे, असे तुमचे म्हणणे आहे का?''

बुद्ध म्हणाला, ''असे मी कधी म्हणालो?''

ब्राह्मणाने वैतागून विचारले, ''मग तुमचे म्हणणे काय आहे?''

बुद्धाने विचारले, ''तू देवाला भेटला आहेस का?''

ब्राह्मण म्हणाला '' नाही''

बुद्धाने विचारले, ''मग तुझे प्रियजन भेटले असतील''

ब्राह्मण म्हणाला, ''नाही''

बुद्धाने विचारले, ''मग तुझ्या पूर्वजांना देव भेटला असेल''

ब्राह्मण म्हणाला, '' नाही''.

बुद्धाने विचारले, ''मग तुला देवाचे ज्ञान कसे झाले?''

ब्राह्मणाने उत्तर दिले, ''हे जग त्याने निर्माण केले आहे...तो आहे पण दिसत नाही, म्हणून त्याचे अस्तित्व नाकारता येत नाही''.

बुद्धाने विचारले, ''हवा आहे का?''

ब्राह्मण म्हणाला ''होय भगवान''.

बुद्धाने विचारले, ''पण ती दिसत नाही...म्हणजे, ती नाही असे म्हणता येते का?''

ब्राह्मण म्हणाला, ''असे कसे म्हणता येईल? हवा आहेच''

बुद्धाने विचारले, ''कशावरुन?''

ब्राह्मण म्हणाला, ''ती जाणवते''

बुद्धाने विचारले, ''कशी?''

यावर ब्राह्मण म्हणाला, ''हवेचा स्पर्श होतो, हवेने पानं हलतात, जोराची हवा आली तर धूळ उडते''...

बुद्ध म्हणाला, ''बरोबर, आपल्या पाच ज्ञानेंद्रियांना ज्याचे अस्तित्व जाणवते ते आहे, असे आपण म्हणतो. त्यासाठी एक किंवा जास्त इंद्रियांना त्याचे अस्तित्व जाणवायला हवे''

ब्राह्मणाने विचारले, ''म्हणजे कसे?''

**बुद्ध म्हणाला, ''हवेतून आपण श्वास घेतो. नाकाने ती जाणवते. पण, ती थंड आहे की गरम हे त्वचेमुळे कळते. हवेचे दोन गुणधर्म समजतात. ती जोराची असल्यास तिचे परिणाम डोळ्यांना दिसतात. हवेचे रुपांतर वाऱ्यात झाल्यास कानाला आवाज येतो. असेच पाण्याचे आहे. पाणी डोळ्यांना दिसते, त्वचेला त्याचे तापमान समजते''**

**ब्राह्मण म्हणाला, ''होय भगवान''**

**बुद्धाने विचारले, ''अशा पद्धतीने देवाचे अस्तित्व जाणवते का?''**

**ब्राह्मण निरुत्तर झाला.**

हीच पद्धत, पुढे गाडगेबाबांनी वापरली... प्रश्न आणि उत्तरे, अशा प्रकारे प्रबोधन करणारा बुद्ध, हा पहिला ज्ञात शिक्षक होय!

आत्म्याबद्दल पुन्हा केव्हातरी...

**– किरण चव्हाण**

---

## 'एकते'मध्ये शक्ती आहे ... निर्विवाद आहे!

पण, महाराष्ट्रासाठी ''भडव्यां''नी 'एकते'ची व्याख्या केली आहे.....ती अशी,

राज्य तुमचे ........ सत्ता आमची
प्रतिनिधी तुमचे ... नोकर आमचे
सरकार तुमचे ..... अधिकारी आमचे
कामगार तुमचे .... कारखाने आमचे
श्रम तुमचे ......... नफा आमचा
शहरे तुमची ........ इस्टेटी आमच्या
व्यवहार तुमचा .... भाषा आमची
समाज तुमचा ...... वर्चस्व आमचे
सत्ता, इस्टेटी, कारखाने, कारस्थाने सगळंच 'त्यांचं'... म्हणजेच, 'मुंबई तुमची, भांडी घासा आमची!'
गा... च्या गां....त गेली असली 'एकता'...!!!

**– मिलिंद कोतवाल, ९८३३०५१५६७**

---

**लेखकाची पोटतिडकीची भाषा, काहीशी 'शिव'राळ वाटली; तरी त्यात, महाराष्ट्रातल्या सामान्य मराठी माणसाच्या हिताच्या दृष्टीकोनातून विस्फोटक अर्थ अगदी ठासून भरलाय. 'शिवी'त भाषेची ताकद एकवटलेली असते; ती यासाठीच की, 'शिवी'त देखील समाजकल्याणकारी 'शिव' असतंच... समझनेवाला चाहिए...!!!**

***...राजन राजे***
***(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# १२ लाख कोटी (१२,०००,०००,०००,०००) बुडाले



मोदी सरकारच्या ८ वर्ष ९ महिन्यांच्या कालावधीत भारतीय बँकांचे १२.१० लाख कोटींची कर्जे पूर्ण बूडाली.

देशाच्या अर्थ मंत्रालयाकडून प्रथमच लेखी कबूली.

स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात मोठे नुकसान!

Non-Performing Assets (NPA) चे प्रमाण भारतात सर्वात जास्त...


जगभरात NPA चे प्रमाण एकूण देऊ केलेल्या कर्जाच्या १% ते २% इतके असते.

RBI च्या फायनान्शियल स्टॅबिलिटी रिपोर्ट मध्ये सप्टेंबर २०२३ पर्यंत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसाठी हा आकडा ९.४% तर खाजगी बँकांसाठी ५.८% इतका जास्त असेल असा अंदाज व्यक्त केला आहे.

थोडक्यात बँक १०० रु. कर्ज देते तर ९.५ रु. बुडत आहेत. २०१४ मध्ये हे प्रमाण ४.१% होते.

हा सर्व पैसा भारतातील सर्वसामान्य जनतेचा, मध्यमवर्गाच्या कष्टाचा आहे. त्यांच्या आयुष्याची पुंजी आहे.

---




''म्हातारा इतुका न अवघे ८४ वयोमान'' असणाऱ्या 'अबिदभाई सुरती' यांचा.... व्यसन, अतिरेकी मनोरंजन, आळस, किळसवाणं राजकारण यात अडकून, वाया जाणाऱ्या सध्याच्या मराठी-तरुणाईच्या बिनकामी ऊर्जेला 'दिशादर्शक' ठरावा असा... 'लाख मोला'चं करोडो लिटर पिण्याचं पाणी वाचवण्याचा एक अतिशय स्तुत्य उपक्रम!

...आपणही निसर्ग-पर्यावरण संरक्षण-संवर्धनाबाबत काही उपक्रम मनापासून राबवू शकतो अथवा 'जागतिक-तापमानवाढी'सारख्या महाविध्वंसक पर्यावरणीय संकटाप्रति प्रचार-प्रसाराची प्रसंगी एकहाती मोहित राबवू शकतो व त्यातूनच, जीवनदायी परमात्म्याच्या ऋणातून अंशतः मुक्त होऊ शकतो... हे समस्त तरुणाईनं वेळीच ध्यानात घेणं आवश्यक आहे!

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...* The First 'Green-Political Party' Of India)

**अजित पवार, भाजपसोबत जाण्यात इतका इंटरेस्ट का घेत आहेत, यावर बरीच चर्चा झाली, होत आहे आणि त्यात तथ्य आहे, हे कोणीही नाकारत नाही... पण; भाजप, अजित पवारांमध्ये एवढा इंटरेस्ट का घेत आहे? राष्ट्रवादी काँग्रेस कमकुवत करणे? विरोधी आघाडी कमकुवत करणे, ही झाली शुद्ध राजकीय उद्दिष्टे; पण, राजकीय अर्थव्यवस्थेमधील उद्दिष्ट काय असू शकते?**

बघू प्रयत्न करुन...

भाजप आज, भारतीय आणि जागतिक कॉर्पोरेट आणि वित्त भांडवलाचे, स्वतःचा पुढच्या काही वर्षांतील अजेंडा राबवण्यासाठी, सर्वात विश्वसनीय व्हेईकल आहे.

भारतीय आणि जागतिक कॉर्पोरेट भांडवलाला विस्तार पावयाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत अधिक खोल आणि अधिक दूरवर पाय रोवयाचे आहेत. त्याच अंगाने त्याची अनेक आघाड्यांवर धडपड सुरु आहे. भारतीय आणि जागतिक भांडवल, भारतात प्रसरण पावण्यासाठी त्याला काही अडथळे जाणवत आहेत. एक आहे, भारतीय अर्थव्यवस्थेमधील सार्वजनिक क्षेत्राचे प्राबल्य. त्याची पकड दूर केल्याशिवाय ते भांडवल प्रसरण पावू शकत नाही. म्हणूनच, सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण होत आहे...

दुसरा अडथळा (आणि असे बरेच आहेत) आहे तो, सहकारी क्षेत्राचा. आयडीओलॉजिकल आणि जमिनीवर दोन्ही पातळीवर. सहकार क्षेत्राला जनमानसातील प्रतिमा छेद देणे, हे अर्धे काम पूर्ण झाले. विविध क्षेत्रांतील सहकारी संस्थाचे खाजगीकरण किंवा कॉर्पोरेटाइझेशन करणे, हा महत्त्वाचा अजेंडादेखील राबवला जात आहे. यात फक्त सहकारी साखर कारखाने नाहीत. दूध, शेतीआधारित उद्योग आणि सर्वात महत्त्वाचे सहकारी बँकिंग येईल.

खालील डॉटस् एकत्र जोडून बघावे लागतील...

**स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा, केंद्रात सहकार मंत्रालय स्थापन करणे व त्याचे नियंत्रण एका वजनदार मंत्र्याकडे सोपवणे...**

**'नोटबंदी'मध्ये सहकारी बँकांची नाकेबंदी करणे...**

**साखर कारखाने, दूध डेअरी यांना धडे शिकवणे...**

**'अमूल मॉडेल'मध्ये होत असलेले बदल...**

**अशा अनेक गोष्टी सांगता येतील.**

सहकारक्षेत्राच्या नाकात वेसण घालण्याचे असेल तर, त्याची सुरुवात महाराष्ट्रापासून करावी लागेल आणि महाराष्ट्रातील सहकारक्षेत्र-रस्ता, पवार कुटुंबियांच्या अंगणातून जातो, हे त्यांना पुरेपूर माहित आहे.

**भारतीय आणि जागतिक कार्पोरेट भांडवलाच्या अजेंड्यामध्ये अजित पवार सामील होण्याचे महत्त्व, ते भांडवल जाणते. म्हणून भाजपच्या माध्यमातून हे सारे कार्यक्रम राबवले जात आहेत.**

या सगळ्या पार्श्वभूमीवर, अजित पवार आणि त्यांचे पाठीराखे, यांना आपल्या कवेत घेण्यासाठी भाजप गेली काही वर्षे का आतुर आहे, याची कारणे कळू शकतील.

अर्थात यात, 'One to One Correspondence' नाही... कधीच असू शकत नाही. पण, २०३४ साली महाराष्ट्रात आणि देशातील एकूणच सहकारक्षेत्राची जी अवस्था असेल, त्याची कारणे २०२३मध्ये अजित पवार यांना, भाजपने आपल्या कवेत घेण्यापर्यंत शोधता येतील !!!

**– संजीव चांदोरकर**



...देशाला आत्मनिर्भर बनवायला चाललेल्या; पण, स्वतः 'आत्मनिर्भर' नसलेल्या 'बीजेपी'ची भीषण शोकांतिका...

# ''विरोधी पक्षीय आमदारांना 'खोके' देऊन खरेदी करणारी बीजेपी, आतून 'खोखली' (खिळखिळी) होत चाललीय''!

**...लवकरच एकवेळ अशी येईल की, 'भाजप' हा मूळ भाजप-संघवाल्यांचा अथवा भारतीय जनतेचा पक्ष न रहाता (तसाही सध्या तो, उत्तर भारतीय जनतेचाच पक्ष प्रामुख्याने आहे), तो फक्त 'मोदी-शहां'चाच पक्ष होईल. ज्या विधिनिषेधशून्य व बेलगाम पध्दतीने फुटीर, बदनाम विरोधीपक्ष नेतेमंडळींना थेट भाजपमध्ये अथवा भाजपाई आघाडीत सामील केलं जातंय आणि मोदी-शहांकरवी त्यांना तत्काळ 'सरदारक्या' बहाल केल्या जातायत... त्या पहाता, शरदरावांसारखीच चाल मोदी-शहा खेळत नसावेत ना?**




काँग्रेसमधून फुटून निघून शरद पवारसाहेबांनी काँग्रेसमधील फुटीरवृत्तीच्या स्थानिक पातळीवरील 'सरदार-बरकदारां'ची (भाई, अण्णा, दादा, साहेब वगैरे उपाधी मिरवणारे व 'सत्ता-मत्ता'बाज राजकारणात मुरलेले 'मनगटशहा') मोट बांधत, अल्पावधीतच 'राष्ट्रवादी काँग्रेस' पक्षाची बांधणी केली होती. तशीच चाल, मोदी-शहा बहुधा खेळत असण्याची दाट शक्यता आहे... जेणेकरुन, नजिकच्या भविष्यात बीजेपीतून, आपल्याच बेदरकार एकाधिकारशाहीविरुद्ध बंड झालंच (जे लवकरच होण्याची दाट शक्यता आहेच) तर, 'राष्ट्रवादी-काँग्रेस'सारखीच मोदी-शहांना देखील, ''बारा गावचं पाणी प्यायलेल्या विविध पक्षीय स्थानिक वजनदार पुढाऱ्यां''ची भाऊगर्दी जमवून, 'राष्ट्रवादी भाजप' नावासारखा एखादा नवा सशक्त-बळकट पक्ष, एका रात्रीत तयार करता यावा.

**बीजेपी, हा 'केडर-बेस्ड' पद्धतशीर घडी बसवलेला तुलनेनं शिस्तबद्ध पक्ष असल्याने व त्याला रा. स्व. संघाचं अधिष्ठान असल्याने... मूळ पक्षावरच दावा करणाऱ्या हल्लीच्या फुटीर राजकीय सौदेबाजांसारखा, मोदी-शहांना मूळ 'भाजप'वर दावा ठोकता येणं, अशा संभाव्य परिस्थितीत शक्यतेच्या कोटीतलं वाटत नाही... त्यामुळेच, 'राष्ट्रवादी भाजप' वगैरे असं वेगळं; पण, मूळ भाजपशी नातं सांगणारं (जसं, आपल्या नव्या 'राष्ट्रवादी-काँग्रेस' पक्षाच्या नावात शरदरावांनी 'काँग्रेस' नावाचं शेपूट कायम ठेवलं) नामाभिधान घेऊनच मोदी-शाह द्वयीला आपलं राजकीय-अस्तित्व टिकवून धरावं लागेल, ही एक संभाव्य शक्यता!**

विशेष नमूद करावयाची बाब ही की, शरदरावांचं महाराष्ट्रातल्या कामगारवर्गाशी कायमच 'उघड व छुपं' असं, दोन्ही प्रकारचं शत्रूत्व राहीलेलं आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात, राष्ट्रवादीचेच 'कामगारमंत्री' राखण्याची खास दक्षता शरदरावांनी कायमच घेतलेली असल्याने, त्या सगळ्याच कामगार-मंत्र्यांनी मिळून, 'कंत्राटी-कामगार पद्धती'ची 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता' महाराष्ट्रातल्या तरुणाईवर लादत महाराष्ट्रातला संपूर्ण कामगारवर्ग व कामगार-चळवळ पद्धतशीररित्या उध्वस्त केलेली आहे (मराठा-समाजातील तमाम तरुणाईला लाखोंचे 'मराठा-महामोर्चे' काढण्याची आफत येण्याचंही मूलभूत कारण तेच आहे, जे सहजी कुणाच्या ध्यानी येत नाही)... कामगारवर्गाला उध्वस्त करण्याचं ते आणि तसंच काम भारतभर, नरेंद्र मोदींचं सरकार 'काळी कामगार-संहिता' (Labour-Code) लादून करु पहातंय.

**शरदरावांचे जसे बड्या भांडवलदारांशी 'घनिष्ट संबंध' होते व आहेत; अगदी डिट्टो तसेच, पं. नरेंद्र मोदींचेही बड्या भांडवलदारांशी नको तेवढे, अत्यंत घनिष्ट संबंध आहेत (खरंतर, 'मिलीभगत'च म्हणायला हवी... त्यातल्या त्यात, गौतम अदानींविषयीचं या दोघांचही अतीव प्रेम म्हणजे, विनोदानं म्हणायचं तर अगदी, हिंदी सिनेमातलं 'एक फूल दो माली' टाईपचंच)... शरदरावांच्या आणि पं. नरेंद्र मोदींच्या राजकारणातला, हा अजून एक विशेष उल्लेखनीय 'समान धागा' होय.**

याच सारासार दृष्टीकोनातून 'शरद पवार', माझे 'राजकीय गुरु' आहेत, असं पं. नरेंद्र मोदी म्हणाले नसावेत ना??

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

---

....कसं असतं बघा, मराठीतल्या म्हणी अगदी परिस्थितीला 'चपखल बसणाऱ्या' म्हणायच्या की, 'अंदाजपंचे दाहोदर' म्हणायच्या??? तर, मित्रांनो, मराठी म्हण अशी आहे की, ''कावळा बसायला आणि फांदी तुटायला!''

...खालील उदाहरणांतून तुम्ही पहाल की, मोदींच्या दमन-यंत्रणांचा काळा 'कावळा' (अर्थातच, सोकावलेला) बसायला आणि ज्यावर, बसला ''त्या उद्योगांच्या फांद्या तुटून खाली पडत अलगद अदानींच्या हाती लागायला''.... याला, 'कर्मधर्म संयोग'च म्हणायचा हो, आपल्यासारख्या पामरांनी!



**NDTV चे संस्थापक प्रणव रॉय यांच्या कार्यालयात, घरी 'सीबीआय'च्या धाडी पडतात... आणि, कंपनी-संस्थापक प्रणव रॉय यांचे NDTVतील २७.२६% भागभांडवल अदानींना मिळतं!**

**ACC, अंबुजा सिमेंट या सिमेंट कंपन्यांच्या कार्यालयांवर CCI च्या धाडी पडतात... आणि, ACC, अंबुजा सिमेंट या सिमेंट कंपन्यांच्या अधिग्रहणामुळे अदानी समूह नंबर दोनचा सिमेंट उत्पादक बनतो!**

**कथित मुंबई विमानतळ घोटाळ्यासंदर्भात GVK समूहावर धाडी पडतात... आणि, GVK एअरपोर्ट डेव्हलपर्स कंपनीत अदानी एअरपोर्ट होल्डिंग कंपनीला त्यांचं जवळपास ९८% भागभांडवल प्राप्त करता येतं!**

**जवळपास २२ तासानंतर नॉयडामधील 'क्विंट' कार्यालयातून आयकर अधिकाऱ्यांचं पथक बाहेर पडत... आणि, ४८ कोटी रुपयात गौतम अदानी 'क्विंटीलॉन बिझनेस मिडीया'चं ४९% भागभांडवल हस्तगत करतात!**

**कृष्णापट्टणम पोर्ट, NDN News वर आयकर खात्याच्या धाडी पडतात... आणि, कृष्णापट्टणम पोर्ट कंपनीचं अदानी पोर्ट्स् आणि SEZ कडून अधिग्रहण पूर्ण केलं जातं!**

*(समाजमाध्यमातून साभार....)*

# हिंदू खतरे में है?



कुठल्याही हुकुमशाही राजवटीला, आपल्या जनतेला भुलवायला आणि पाठिंबा द्यायला एक शत्रू दाखवावा लागतो. आपल्या वाईटाला, आपला सुवर्णकाळ मातीत जायला हा शत्रूच कारणीभूत आहे, अशी ठाम समजूत करुन दिली जाते…

**भारतात जे काही वाईट घडलेलं आहे, त्याला मुस्लीम जबाबदार आहेत आणि हा देश, सोने की चिडिया होता, त्याची बरबादी व्हायला इस्लाम कारणीभूत आहे हे, आपल्याला पटवून दिलेलं आहे…**

आता आधुनिक काळात, या प्रचाराची पुढची पातळी, भारतातल्या मुस्लिमांची संख्या वाढून हिंदू खतरे में येतील ही, लोणकढी थाप मारली जाते. सांख्यिकी आकडेवारीने या दाव्यातला फोलपणा कळून येईलही…

मुळात, भारतातल्या हिंदूंनी, तत्कालीन काळात इस्लाम का स्विकारला? हा कळीचा मुद्दा उरतोच!

**धर्मांतर दोन प्रकारे होत होती…**

**एक म्हणजे तलवारीच्या धाकाने आणि दुसरं लाभांच्या, अधिकारांच्या, सवलतींच्या अपेक्षेने.**

तलवारीच्या धाकाने धर्मांतर झालं असं म्हणावं तर, ही इस्लाममध्ये गेलेली मंडळी, पुन्हा पवित्र वगैरे करुन हिंदुधर्मात आणण्याची सोय नव्हती का? अशी इनकमिंगची सोय, सोपी सुटसुटीत असती तर, अनुकूल काळ आल्यावर, ही मंडळी पुन्हा हिंदू होऊ शकत होती… अशी सोय उपलब्ध होती का?

हिंदुधर्माने; माणसांना, आपल्या धर्मात येण्याची प्रक्रिया क्लिष्ट केलेली होती; म्हणून, इच्छा असूनही लोक माघारी येऊ शकली नाहीत, हे सत्य नाकारता येईल का?

सन्मानाच्या, लाभांच्या, अधिकारपदांच्या, सवलती मिळतील, रोजगार मिळतील, या अपेक्षेने स्वेच्छेने इस्लाम स्विकारलेली जनता, साहजिकच भौतिक सुखांपुढे धर्म गौण मानणारी होती; म्हणूनच, धर्म सोडून गेली किंवा त्यांच्या धर्मविषयक जाणीवा, धर्माबद्दल असलेली आस्था आणि आपुलकी अतिशय विसविशीत होती, कमकुवत होती हाच निष्कर्ष निघतो ना?

**मुळात, हिंदुधर्मात असलेली असमानता, केवळ जन्माने तुम्ही कुठल्या जातीत, वर्णात जन्मलेले आहात, त्यानुसार तुम्हाला समाजात मिळणारा सन्मान, तुमचं स्थान ठरवणार असेल; तर, साहजिकच असं अपमानित करणारा धर्म, कुणाला आपलासा वाटणार आहे? मग, ज्याच्या विषयी आपलेपणाची भावना नाही, तो धर्म कवटाळून बसण्यात अर्थ तरी काय आहे?**

हिंदुधर्मात असलेल्या त्रुटी दूर केल्या, तिथे समानता आली, सगळ्यांना समान हक्क मिळाले तर, कोण कशाला धर्म सोडून जाईल, ही साधी बाब आपल्याला कळत नाही आणि आपण हिंदूंनी धर्म सोडला, हेच तथ्य इस्लामने धर्मांतर घडवून आणले असं उलट पद्धतीने मांडून खापर फोडतो…

हिंदू धर्मातून, धर्म त्यागून इतर धर्म स्विकारणे थांबवण्यासाठी, हिंदू धर्मातल्या खालच्या वर्गाला सन्मानाने वागवण्याची गरज आहे, हे विधानच मुळात गंडलेलं आहे…

**हिंदू धर्मात हा वरचा, तो खालचा या उतरंडी नष्ट केल्या आणि सगळे एकाच पातळीवर समान झाले, समानता हा हिंदू धर्माचा गाभा झाला तर, कुणाला सन्मानाने वागवण्याची गरजच भासणार नाही ना? कुणाला तरी सन्मानाने वागवण्याची गरज आहे असं आपण म्हणतो, त्यावेळी आपण वरच्या पायरीवर आहोत आणि कुणीतरी खालच्या पायरीवर आहे हे गृहीतक मान्य करतो ना?**

हिंदुधर्म चांगला, निर्दोष, श्रेष्ठ असेल तर, त्यातून बाहेर पडून जैन, बौद्ध, लिंगायत, शीख धर्म का स्थापन झाले?

दुसरी बाब आणि कळीचा मुद्दा…

'हिंदू खतरे मे है' आणि हिंदू धर्मातून, इतर धर्मात जाणाऱ्या लोकांना माघारी आणलं पाहिजे किंवा थोपवलं पाहिजे, असं जे म्हणतात त्यांना बेसिक प्रश्न.

**समजा, हिंदू धर्मातून कधीकाळी एखाद्याचे आजे-पणजे मुसलमान झाले असतील आणि आता त्यांना पुन्हा हिंदू होण्यासाठी तुम्ही तयार असलात; तरी, त्यांना परत हिंदू होऊन मिळणारी जात कोणती असेल?**

**त्यांना त्यांची पूर्वीची जात मिळेल की, प्रमोशन होऊन नवी जात मिळेल?**

**हा प्रश्न विचारला की, हा धर्म-धर्म खेळणारी मंडळी, थातुरमातुर उत्तरं देऊन वेळ मारुन नेतात…**

या सगळ्या गोष्टींचं सार, फार सोपं आहे. हिंदू धर्माच्या उतरंडीत, वरच्या वर्गात असलेल्या लोकांना खालच्या पायरीवर असणारी लोकं, फक्त आपले गुलाम आणि सोल्जर्स किंवा सेवेकरी म्हणून हवे आहेत.

**''हिंदू खतरे में है''च्या नावाखाली दंगलीत राडे करायला, गोरक्षक म्हणून केसेस अंगावर घ्यायला, प्रत्येक ठिकाणी हाणामाऱ्या करायला हे सोल्जर्स हवे आहेत; मात्र, या सोल्जर्सला समानतेने वागवण्याची आमची तयारी नाहीये!**

तुम्ही तुमच्या जन्मदत्त जातीनुसार, तुमच्या पायरीनेच राहीलं पाहिजे आणि तुम्ही वैदिकांच्या पालखीचे भोई म्हणूनच जगलं पाहिजे, एवढाच सोपा अर्थ.

ही समानता जोवर हिंदुधर्म स्विकारत नाही, तोवर हिंदू खतरे मे है, या भंपकपणाला काहीही अर्थ नाही!

**-आनंद शितोळे**

रविवारची पोस्ट, हिंदू घरवापसी

आपल्याखांद्यावर आपलेच मडके



# नीचता, क्रूरता, अमानुषतेचा 'भांडवली-व्यवस्थे'ने रचलेला अगदी आयफेल टॉवरच्या उंचीचा 'मणिपुरी' कळस...

## जगण्यावरचा सगळा विश्वासच उडवून टाकणाऱ्या असंख्य घटनांनी खच्चून भरलेला आहे...!!!



**'दिल्लीश्वरां'च्या खास मर्जीतील एका मोठ्या उद्योगपतीला, 'प्लॅटिनम'सारख्या सोन्यापेक्षाही कैकपटीने मौल्यवान खनिजांनी संपृक्त असलेल्या, मणिपूरच्या कूकी-आदिवासी जमातीची हक्काची जंगल-जमीन आंदण देण्यासाठीच... हे सैतानाला, हैवानाला लाजवणारे अत्याचार सुरु आहेत का, हा प्रश्न प्रत्येक संवेदनशील भारतीय मनाला पडायला हवा, एवढी भीषण वस्तुस्थिती आहे.**

**अशा दंगली, लैंगिक-अत्याचार, असंख्य 'ब्रह्महत्या' घडवून, आपलं राजकीय व आर्थिक इप्सित साध्य करण्याचा हा प्रवास... 'गुजराथ ते मणिपूर' असा, 'पश्चिमेकडून पूर्वेकडे' सुरु आहे; पण, उत्तरेकडून तो दक्षिणेकडे जाऊच शकत नाही... कारण तिथे, भाजपाला कोपराने खणण्याएवढी मऊ मातीच उपलब्ध नाही...!!!**

...पण, मधला आमचा महाराष्ट्र, हा आता राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा, अशा लायकीचा राहीलेला नसून लघुदृष्टीच्या नीच-स्वार्थी मराठी राजकारणी उंदीर-घुशींनी तो साफ आरपार पोखरुन ठेवलाय... कुणीही यावं आणि कोपरा-कोपऱ्याने खणत जावं, असा प्रतिरोधशून्य भुसभुशीत महाराष्ट्र देश त्यांनी बनवून ठेवलाय. शिवछत्रपतींनी, संत तुकारामादी संतमहंतांनी, सानेगुरुजी-कुसुमाग्रजांसारख्या कोमलहृदयी व्यक्तित्वांनी, प्रबोधनकार ठाकरेंसारख्या समाजसुधारकांनी घडवलेले आणि महाराष्ट्राच्या लालकाळ्या मातीत जडवलेले मराठी-संस्कृतिचे 'मैलाचे दगड'... उण्यापुऱ्या चारपाच दशकातच यांनी आपल्या संधिसाधू, फसव्या राजकारणाने उलथून लावलेत...

**तत्त्वनिष्ठेचे-नीतिमत्तेचे निखंदून टाकलेले, ढासळवून टाकलेले ते दगड... आजवरच्या तमाम हरामखोर मराठी-राजकारण्यांनी देशी (जैन, गुजू, मारवाडी), विदेशी भांडवलदारांना विकून खाल्लेत, आरपार खोलवर रिचवलेत... जेवढे जेवढे ते दगड, या मराठी राजकारण्यांच्या जठरात खोल खोल पचनी पडत गेलेत... तेवढा तेवढा आमचा महाराष्ट्र आणि त्याची संस्कृती-नीतिमत्ता पाताळात खोल गाडली गेलीय...!!!**

कधि बोगस-बेगडी 'हिंदुत्वा'च्या वैचारिक टोळधाडीतून; तर, कधि 'शाहू, फुले, आंबेडकरां'च्या नावाने चाललेल्या तद्दन ढोंगी अशा, कर्कश्श राजकीय कलकलाटातून 'मराठी बुद्धी व मराठी मनं' पद्धतशीर बधीर करण्यात आलीयत... त्यातून, खुबीने कंत्राटी-कामगार पद्धत (लष्करातल्या 'अग्निपथा'नंतर ती पोलिसदलात देखील येऊ घातलीय), Flexible-Labour, आऊटसोर्सिंग, NEEM आणि आतातर 'Gig Workers' (पाश्चात्य 'जाझ' संगीतकार 'गिग्ज...Gigs' या नावाने 'अल्पमोबदल्यात, ठराविक अल्पमुदतीचे कार्यक्रम' सादर करतात, त्यावरुन बेतलेला शब्द) वगैरे मराठी-श्रमिकांचं टोकाचं शोषण करणाऱ्या अत्यंत घातकी अशा नवनव्या संकल्पना व त्यातूनच मराठी कामगारांनाच नव्हे; तर, अगदी तंत्रज्ञ, डॉक्टर्स, अकाऊंटंट्स, आयटी-इंजिनियर्स अशा बुद्धिमान पांढरपेशावर्गालाही गुलामगिरीत ढकलणारा 'कंपनी-दहशतवाद (Corporate-Terrorism)' प्रसवण्यात व राबवण्यात आलाय.

> **आमचा महाराष्ट्र, हा आता राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा, अशा लायकीचा राहीलेला नसून लघुदृष्टीच्या नीच-स्वार्थी मराठी राजकारणी उंदीर-घुशींनी तो साफ आरपार पोखरुन ठेवलाय...**

...म्हणूनच, समस्त मराठी कामगार-कर्मचारीवर्ग उंदरासारखा भेदरलेला आहे आणि त्या आपल्या गांडूगिरीतूनच कामगार-चळवळीचं, स्वतःच्याच नाकाम हातांनी श्राद्ध घालून बसलेला आहे. तर, दुसऱ्या बाजुला आमची आजची सगळीचं राजकीय मराठी तरुणपिढी पूर्ण गोंधळलेली दिसत्येय... रामायण सांगून संपलं तरी, 'रामाची सीता कोण', हा प्रश्न त्यामुळेच त्यांना पुन्हा पुन्हा विचारावासा वाटतोय, एवढी त्यांची आकलनशक्ती नष्टप्राय झालीय. **कपडे बदलावेत तसे सोयीनुसार पक्ष, निष्ठा व राजकीय धोरणं बदलणाऱ्या राजकीय नेत्यांविषयी फार काही संतापाचा लाव्हा, त्यांच्या आतून उसळत नाही... मिळेल ती संधि, आधाशासारखी गाठून 'श्रमाविना सत्ता व संपत्ती' कशी मिळेल... कुणाच्याही जीवावर (मग तो, राजकारणी किती का पातकी, पाजी, गुंड-खुनी-ब्रह्महत्यारा का असेना) व कुणाचाही जीव घेऊन, आपल्याला मौजमजा कशी मारता येईल... एवढाच विचार, त्याच्या मनात 'सैराट' झालेला असतो!** मराठी जगणं, आता 'एक टाईमपास' बनता बनता पूर्णतया 'दैवाधीन' बनून गेलंय... म्हणूनच लालबागचा राजाच्या आणि प्रभादेवीच्या सिद्धीविनायकाच्या मंदीरातल्या मारुतीच्या शेपटासारख्या लांबलचक रांगा आणि घरोघरच्या तसेच, सार्वजनिक गणपतींच्या मूर्तींची संख्या-पूजा वर्षागणिक नुसत्या वाढतच चालल्यात (मराठी घराघरात व सार्वजनिक ठिकाणी प्रतिवर्षी लाखो-करोडोंनी होणाऱ्या सत्यनारायण पूजा अजून वेगळ्याच).

आपल्या जगण्याचे सगळे दोर, हतबलतेच्या जोडीनं अगदी थेट निर्लज्जपणे, या 'रक्तपिपासू-शोषक व्यवस्थे'च्या (Vampire-State System) खुशाल हातात सोपवून मराठी तरुणाई बसलीय, ही फार मोठी शोकांतिका आहे.


...म्हणूनच **जेव्हा जेव्हा, महाराष्ट्राच्या शहरी भागात रस्ते-महामार्ग व गगनचुंबी इमारती (२५-३० मजल्यांपासून थेट ६५-७० मजल्यांपर्यंत), विलासी मॉलटॉल-पंचतारांकित बागबगीचे, बुलेट-ट्रेनसाठी आरे कॉलनी कारशेड यासारखे तथाकथित विकास-प्रकल्प होतात किंवा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जैतापूर, नाणार, बारसू-सोलगाव यासारखे स्थानिक मराठी पिढ्यापिढ्यांना व निसर्ग-पर्यावरणाला उध्वस्त करणारे अनेक छोटेमोठे प्रकल्प येत असतात... तेव्हा, तेव्हा लघुस्वरुपात 'मणिपूर'च महाराष्ट्रात जागोजागी घडत असतं, भविष्यात नव्याने घडत रहाणार असतं... पण, हे समजण्याएवढी 'किमान प्रज्ञा'च मराठी माणसाकडे कुठे शिल्लक राह्यलीय? त्यामुळेच, मणिपूरच्याच काय; पण, बारसू-सोलगावच्या 'आगीची धग' सुद्धा, मराठी काळजापर्यंत पोहोचायला तयार नाही, यापरतं दुसरं दुर्दैव काय??**

***...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*



महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल कोशारींचा कारभार बेकायदेशीर व असंविधानिक, निवडणूक-आयुक्तांची नेमणूक मनमानी पद्धतीने, 'ईडी'चे प्रमुख संजयकुमार मिश्रा यांच्या लागोपाठच्या 'तीन मुदतवाढी' बेकायदेशीर... मग आता, सरकारला सत्तेवर रहाण्याचा नैतिक-अधिकार नेमका कुठला...???

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*




अगर, उनकी घोटाले की गारंटी है, तो ''.......'' की भी 'गारंटी' है, हर घोटालेबाज को मंत्री बनाने की 'गारंटी' है...

''जिसका जितना बडा घोटाला, उसको उतना बडा मंत्रीपद देने की 'गारंटी'!''

''गधे की बारात निकली, नाच रहें हैं ऊंट...

'दो यार' तो ठग लगते हैं, देश रहे हैं लूट''!!!

*...राजन राजे*

*(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*



सत्तेसाठी इतिहासात 'काका' बेईमान होते; पण, कलियुगात 'पुतणे' बेईमान निघाले... घोर कलियुग म्हणतात, ते हेच!

म्हणून म्हणतो, पुतणे मोठे करु नका... विश्वास ठेऊन पुतणे मोठे केल्यावर काय होतं; याचं, हे दुसरं मोठं उदाहरण!

(समाजमाध्यमातून साभार...)



*ग्रंथाली प्रकाशन आणि सुनील कर्णिक मित्र-परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने, वाचनकट्टा अंतर्गत, ज्येष्ठ लेखक-पत्रकार व संपादक सुनील कर्णिक यांच्या, ''स्वतः खेरीज सर्वकाही'' या गौरवग्रंथाचे प्रकाशन आणि त्यांचा सत्कार सोहळा, मराठी ग्रंथ-संग्रहालय, ठाणे येथे शनिवार, दि. २४ जून-२०२३ रोजी, आयोजित करण्यात आला होता. यावेळी, ''आजचा खरा-खोटा मराठी साहित्य व्यवहार'' या विषयावर रोखठोक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात, राज्यसभा खासदार श्री. कुमारजी केतकर व झुंजार पत्रकार निखिल वागळे तसेच श्रीकांत बोंजेवार, प्रा. विजय तपासे, कवियित्री-लेखिका नीरजा आणि उत्सवमूर्ती सुनील कर्णिक यांनी सहभाग घेतला होता. दरम्यान, या साहित्य-सोहळ्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे हे विशेष निमंत्रित होते. याप्रसंगी सुनील कर्णिक यांचे, मा. राजन राजे यांनी पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक अभिनंदन करुन, त्यांच्या साहित्यसेवेसाठी अनेक शुभेच्छा दिल्या.*



*पालघर जिल्ह्याच्या वसई तालुक्यातील, भाताणे याठिकाणी असलेल्या 'स्टेलमेक लिमिटेड' या कंपनीतील 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या कामगार-सदस्य/प्रतिनिधींनी अध्यक्ष मा. राजन राजे यांची, बुधवार, दि. १२ जुलै-२०२३ रोजी, ठाणे येथील कार्यालयात भेट घेतली. या भेटीदरम्यान कंपनी व्यवस्थापनाकडून, कामगारांना दिल्या जाणाऱ्या वर्तणुकीसंदर्भात आणि पुढील वाटचालीबाबत, सखोल चर्चा करण्यात करण्यात येऊन, मा. राजन राजे यांच्याकडून, कामगारांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर, कामगार प्रतिनिधी संतोष तावडे, 'स्टेलमेक'चे युनिट अध्यक्ष : रमेश गुप्ता, सचिव : महेंद्र जाधव, तसेच दिनेश चव्हाण, परेश खिरखिरे, दिनेश गणेशकर आणि जितेंद्र गुप्ता आदी कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.*

## *सरण ते राजकारण*

*तिकडे समृध्दी महामार्गावर
झाले देहाचे कोळसे,
इकडे मात्र राजकारण
घेत होते 'वळसे'
ओळख पटली नाही
म्हणून सामुहिक अंत्यविधी,
तिकडे त्यांची चिता जळाली
इकडे ह्यांचा 'शपथविधी'
मृतकांचे हाल बघून
पाझर काळजाला फुटेल,
अशा वेळी 'प्रफुल्ल' चेहरा,
सांगा कुणाला 'पटेल' ?*

*'पुतण्या' च्या मुतण्यावर
किती चढला होता पारा,
'घड्याळ' म्हणालं काट्यांना
वाजवले माणुसकीचे बारा.
'भूज-बळ' वाढताच
'कमळा' बाईवर हा असर पडला,
टाहो फोडणाऱ्यांच्या सांत्वनाचाही
विसर पडला!*

*आज 'शरदा' चे चांदणे
ऊद्या 'मून-डे' होईल
'पाच लाख' दिल्याने
जिव कसा परत येईल ?
'नमो नमो' च्या मंत्रासंगे
ते फेकतात 'इडी' लिंबू,
गट 'तट-करे' ल त्याला
तिकडे भेटतो तंबू !*

*मृतदेहाचे सरण पेटताच
गहीवरून आले मन,
पण पुढाऱ्यांनी साजरा केला
'शपथविधी' चा 'हा-सण'
घाला घातला काळाने
मृत्यूने साधला डाव,
अशा वेळी तुमचा 'धर्म'
सांगा कुठे गेला 'राव' ?*

*काय करावे सुचत नाही
आमचे गाऱ्हाणे 'ऐक-नाथा'
'धनुष्या' तील 'बाण'
कुणावर चालतील आता ?
सोहळ्यामुळे श्रध्दांजलीसाठी
नव्हती कुणाला ऊसंत,
स्वप्नातही वाटलं नाही
ते दाखवताय तुम्ही 'पंत'*

*... ॲड. अनंत खेळकर*

*(अकोला)*

# बुडत्या बँका...नफ्याचे खाजगीकरण आणि तोट्याचे राष्ट्रीयीकरण...

## मागच्या नऊ वर्षात ११ लाख कोटीची कर्जे राईट ऑफ झालीत...

रिझर्व्ह बँकेने ८ जून २०२३ च्या आपल्या परिपत्रकात 'जाणीवपूर्वक कर्जबुडव्या व्यक्ती आणि कंपन्यां'ना एकरकमी सेटलमेंटचा पर्याय द्यावा आणि एक वर्षांनी त्यांना पुन्हा कर्ज द्यावे', असं म्हटलेलं आहे.

भक्त आयटी-सेल मधून येणारे 'रेडीमेड शेणाचे पो' टाकतात...

**'शेणाचा पो' क्रमांक एक**
राईट ऑफ म्हणजे कर्जमाफी नव्हे. कर्ज फक्त ताळेबंद आणि नफातोटा पत्रकात दाखवलेलं नाही पण त्याची वसुलीची प्रक्रिया सुरु आहे.

**'शेणाचा पो' क्रमांक दोन**
अमक्याचे एवढ्या कोटीचे बंगले, जमिनी, कंपन्या सरकारने जप्त केल्यात.

**'शेणाचा पो' क्रमांक तीन,**
हे कर्ज आमच्या काळात दिलेच नव्हते.

२०१६ साली सरकारने नादारी आणि 'दिवाळखोरी संहिता-२०१६' लागू केली... या अंतर्गत अशी थकीत कर्जांची वसुली करायला सबंधित कंपन्यांची मालमत्ता विकणे व इतर उपाययोजना केल्या जातात.




मे-२०२३ चा रिझर्व्ह बँकेचा या नादारी संहितेचा अहवाल धक्कादायक आहे.

एकूण प्रकरणे ६७८ पैकी १७८ मोठ्या धेंडाची कर्जप्रकरणे ज्याची रक्कम ८.०९ लाख कोटी रुपये.

या १७८ लोकांच्या तारण, गहाण, जप्त संपत्तीचे मूल्य कर्जाच्या फक्त १७ टक्के म्हणजेच १.५१ लाख कोटी.

म्हणजे बँकांना सहन करावा लागणारा निव्वळ तोटा ६.५८ लाख कोटी.

बँकांचा तोटा ६.५८ लाख कोटी आणि देशात अग्रेसर महाराष्ट्राचा २०२३ चा अर्थसंकल्प ५.४७ लाख कोटी.

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पापेक्षा बँकाचे बुडालेले पैसे जास्त आहेत.

हे पैसे लोकांच्या कष्टाचे, करदात्यांचे, लोकांनी चार पैसे मिळतील आणि सुरक्षित राहतील या आशेने बँकेत ठेवलेले पैसे आहेत.

जर ही कर्जे तुमच्या काळात दिलेली नाहीत तर, तुम्ही कर्जे राईट ऑफ करण्याची बँकांना परवानगी दिलीच का? कर्ज देण्यासाठी सांगणारे नेते, काँग्रेसच्या मंत्री आणि कंपनीच्या लोकांना सरळ अटक करायची. अडवल कुणी?

लोकहो,

करदात्यांच्या पैशाने मोठ्या उद्योगांना कर्जे देऊन बुडवून त्यांना पळून जाण्याची संधी देणे आणि कर्जे बुडवून बँका बुडवणे आणि उद्योगांना सरकारी कंपन्या आंदण देणे हेच अच्छे दिन आणि विकासाचे मॉडेल का ?

पिसारा फुलवून येणाऱ्या मोरांसाठी : पहिल्या कॉमेंटमध्ये असलेल्या लोकसत्तामध्ये आलेला २७ जून-२०२३चा श्रीनिवास खांदेवाले यांचा लेख नीट वाचून घ्या आणि बातमी खोटी वाटत असेल तर, 'लोकसत्ता'ला कोर्टात खेचा...

**...आनंद शितोळे,** बुडत्या बँका नफ्याचे खाजगीकरणतोट्याचे राष्ट्रीयीकरण

---



**सद्यस्थितीत देशात आणि विशेष करुन महाराष्ट्रात माजलेल्या राजकीय बजबजपुरीच्या पार्श्वभूमीवर, मराठी तरुणवर्ग संभ्रमावस्थेत सापडलेला असतानाच, रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील, ध्येयवेड्या स्थानिक भूमिपुत्र तरुणांनी, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची; मंगळवार, दि. ४ जुलै-२०२३ रोजी, त्यांच्या ठाणे कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. आगरी-कोळी समाजाचा बालेकिल्ला असलेल्या रायगड जिल्ह्यातील आगरी-कोळी-कराडी संघर्ष सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्य या संघटनेचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष रोहन पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष रवींद्र घरत, पनवेल तालुका अध्यक्ष प्रदीप पाटील आणि पनवेल तालुका कार्याध्यक्ष वृषभ गोंधळी या तरुणांनी, मा. राजन राजे यांची भेट घेऊन, त्यांच्याशी राजकीय आणि सामाजिक विषयांवर प्रदीर्घ चर्चा करीत, त्यांचे बहुमोल मार्गदर्शन घेतले.** केंद्र सरकारपुरस्कृत येऊ घातलेले काळे कामगार कायदे, नव-अस्पृश्यता म्हणून ओळखली जाणारी, कंत्राटी-कामगारपद्धत नावाची गुलामगिरी, देशातील वाढता जातीयवाद, दंगलसदृश परिस्थिती आणि धार्मिक उन्माद, यामुळे भविष्यात स्थानिक भूमिपुत्र कसा उध्वस्त होईल, याचे भीषण वास्तव मा. राजन राजे यांनी यावेळी विषद केले. याप्रसंगी 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर, 'धर्मराज्य पक्षा'चे ज्येष्ठ कार्यकर्ते भरत मते, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे शहर संघटक अजय जया, 'धर्मराज्य आंदोलन-समिती'चे प्रमुख कार्यवाह संतोष तावडे आदी मंडळी उपस्थित होती.

# राजन राजेंना अशीही गुरुदक्षिणा...

## कायदेशीर देणीतील २५ हजारांची रक्कम, 'धर्मराज्य पक्षा'स अर्पण करुन, दत्तात्रय मुरबाडे यांनी बजावली कृतज्ञता!






**संघर्षात निष्ठा आणि सातत्य असले की, प्रस्थापितांनाही सर्वसामान्यांसमोर झुकावेच लागते. याचे ढळढळीत उदाहरण म्हणून, ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील, स्थानिक भूमिपुत्र असलेल्या श्री. दत्तात्रय मुरबाडे यांचे नाव अग्रक्रमाने घेता येईल. मुरबाड एमआयडीसीतील मु. कुडवली येथील, 'फॅबटेक वर्क्स अँड कन्स्ट्रक्शन प्रा. लि.' या कंपनीच्या मुजोर व्यवस्थापनाविरोधात, श्री. दत्तात्रय मुरबाडे यांनी, सनदशीर आणि लोकशाहीमार्गाने, कायदेशीर लढा दिला. अवघी दोन-पाच नव्हे; तर, तब्बल बारा वर्षांच्या अविरत कायदेशीर संघर्षानंतर, अखेर कंपनी व्यवस्थापनाला 'सत्या'पुढे झुकावेच लागले. मात्र, या संपूर्ण एक तपाच्या तपश्चर्येत श्री. दत्तात्रय मुरबाडे यांच्या पाठीशी 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष मा. राजन राजे हे, 'दत्त' म्हणून उभे ठाकले होते. 'फॅबटेक' कंपनी व्यवस्थापनाविरोधात २०११मध्ये सुरु झालेला कायदेशीर-न्यायालयीन लढा, २०२३मध्ये संपला आणि श्री. दत्तात्रय मुरबाडे यांच्या सातत्यपूर्ण संघर्षाला, अखेर बारा वर्षांनी का होईना, पण फळ मिळाले. मा. कामगार न्यायालय, ठाणे यांच्यापुढे कंपनी व्यवस्थापनाने दिलेल्या कायदेशीर देणीमधील, २५ हजारांची रक्कम, मुरबाडे यांनी, गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून मा. राजन राजे यांच्याकडे गुरुदक्षिणा म्हणून धनादेशाद्वारे सुपूर्द केली.**

फॅबटेक वर्क्स अँड कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीतील कामगारांना पगार, तोही तुटपुंजा, याव्यतिरिक्त कोणत्याही सोयी-सुविधा पुरविल्या जात नव्हत्या. एवढंच नव्हे; तर, कंपनीचे नाव मस्टरकार्डवर छापले जात नसे, त्यावर सुपरवायजरची सहीदेखील नसायची. आपल्यावरील अन्यायाची व आपले हक्क डावलले जात असल्याची जाणीव झाल्यावर, वर्ष २०११ साली, श्री. दत्तात्रय मुरबाडे यांनी, 'फॅबटेक कामगार-क्रांती संघटना' या नावाने कंपनीत युनियनची स्थापना केली आणि मा. राजन राजे हे संघटनेचे अध्यक्ष झाले. दरम्यान, **व्यवस्थापनाच्या वाढत्या अन्यायी वर्तणुकीविरोधात, श्री. मुरबाडे यांनी, कंपनीतील कामगार प्रतिनिधी व सदस्यांना सोबत घेत, स्थानिक तहसिलदारांची भेट घेतली. त्यावर तहसीलदारांनी, कल्याण येथील सहाय्यक कामगार उपायुक्त, श्री. प्रकाश पाटील यांना ताबडतोब बोलावून, एक बैठक घडवून आणली. त्यानंतर, कामगार प्रतिनिधी आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यात सलग तीन दिवस पार पडलेल्या बैठकांमध्ये, कामगारांना यापुढे ओळखपत्र, मस्टरकार्ड, किमान वेतन, डबल ओव्हरटाईम व पीएफ यांची त्वरित अंमलबजावणी झाली पाहिजे! असे स्पष्ट आदेश, सहाय्यक कामगार उपायुक्तांनी कंपनी व्यवस्थापनाला दिले. मात्र, पगारवाढीच्या करारासंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करुनही, व्यवस्थापन बोलणी करण्यासाठी बसले नाही.** परिणामी, नाईलाजास्तव कामगारांनी दि. २८ सप्टेंबर-२०११ रोजीपासून बेमुदत संप सुरु केला. यादरम्यान, **संपाच्या एक महिना अगोदर म्हणजेच, दि. २१ ऑगस्ट २०११ रोजी, कंपनी व्यवस्थापनाने सूडबुद्धीने आणि आकसापोटी, श्री. दत्तात्रय मुरबाडे यांना, कोणतीही नोटीस किंवा सूचना न देता, तडकाफडकी नोकरीवरुन काढून टाकले. त्याबाबत, दि. २४ ऑगस्ट-२०११ रोजी, श्री. मुरबाडे यांनी, सहाय्यक कामगार उपायुक्तांकडे तक्रारही केली. त्यानंतर, वारंवार व्यवस्थापनाकडे तक्रारी दखल करुनदेखील, त्यांना कामावर रुजू करुन घेतले नाही. त्यानंतरही संप मात्र, अधिक तीव्रतेने सुरुच राहिला...**

यादरम्यान, संपकाळात 'फॅबटेक' कंपनी व्यवस्थापनाने गुंडांची मदत घेत, बळजोरीने काही कामगारांना हिशोब घेण्यास भाग पाडले. ज्या कामगारांना, व्यवस्थापनाकरवी गुंडांच्या माध्यमातून हिशोब घेण्यास बळजोरी करण्यात आली होती, त्यांची अवघ्या दोन ते तीन लाखांत बोळवण करुन, त्यांना बाजूला व्हायला सांगण्यात आले आणि ते झालेही. हा संप डिसेंबर-२०११ पर्यंत म्हणजेच, चार महिने चालला. संघटनेतील सात कामगार सदस्यांपैकी, चौघांनी हिशोब घेतल्यावर, प्रत्यक्षात तिघांचाच न्यायालयीन लढा सुरु होता. त्यापैकी दोन कामगारांचे खटले वेगळे होते; तर, **श्री. दत्तात्रय मुरबाडे यांनी, वैयक्तिकरित्या व्यवस्थापनाविरोधात आपला संघर्ष अधिक तीव्रतेने सुरुच ठेवला. दरम्यान, वर्ष-२०१२मध्ये, कामगार उपायुक्त, ठाणे यांच्या दोन क्रमांकाच्या न्यायालयात, त्यांचा खटला वर्ग करण्यात आला. यावेळी श्री. दत्तात्रय मुरबाडे यांनी, आपल्याकडील सर्व पुरावे आणि कागदपत्रे मा. कामगार न्यायालय, ठाणे यांच्याकडे सुपूर्द केली. या संपूर्ण कायदेशीर प्रक्रियेत 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर यांनी, वेळोवेळी श्री. मुरबाडे यांना मार्गदर्शन व मानसिक बळ दिले. अर्थात, यामागची संपूर्ण प्रेरणा ही, 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे संस्थापक अध्यक्ष मा. राजन राजे यांचीच होती. शेवटचा कामगार शिल्लक असेपर्यंत, त्याच्या न्याय्य-हक्कासाठी, मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत लढेन! हा मा. राजन राजे यांचा दृढनिर्धार, संघर्षाच्या काळात, प्रत्येक कामगारासाठी आश्वासक असतो.** म्हणूनच, आतापर्यंत प्रत्येक मुजोर व्यवस्थापनाला नमते घ्यावेच लागलेले आहे. अखेर, एप्रिल-२०२३ मध्ये, 'फॅबटेक'च्या मुजोर कंपनी व्यवस्थापनालादेखील, न्यायालयीन लढाईत नमते घ्यावेच लागले. मा. कामगार न्यायालय, ठाणे यांच्यासमोर, श्री. दत्तात्रय मुरबाडे यांना, व्यवस्थापनाने पाच लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला आणि गेल्या बारा वर्षांचा संघर्ष संपुष्टात आला. महत्त्वाची आणि अभिमानास्पद बाब म्हणजे, या संपूर्ण संघर्षाच्या काळात, अगदी संपाच्या पहिल्या दिवसापासून, श्री. दत्तात्रय मुरबाडे यांच्या सुविद्य पत्नी, सौ. वैशाली यांनी, त्यांना खंबीरपणे साथ दिली. आपल्या पतीच्या पाठीशी, त्या ठामपणे उभ्या राहिल्या. **इतकंच काय; तर, संपकाळात कंपनी व्यवस्थापनाने नेमलेले गुंड ज्यावेळी, श्री. दत्तात्रय मुरबाडे यांना, 'समज' द्यायला त्यांच्या घरी येत असत, त्यावेळी सौ. वैशाली त्यांना थेटपणे सामोऱ्या जात, हा आमच्या हक्काचा लढा आहे, तुम्ही कितीही जोर जबरदस्ती केलीत, तरी आम्ही आमच्या ध्येयापासून हटणार नाही! असे आव्हान देत. अन्याय करणाऱ्यापेक्षा, अन्याय सहन करणारा अधिक दोषी असतो ही, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिकवण, मा. राजन राजे सातत्याने आपल्या कामगारांच्या धमण्यांमधून भिनवत आलेले आहेत. त्याचाच परिपाक म्हणजे, श्री. दत्तात्रय मुरबाडे यांचा लढा म्हणता येईल. या लढ्याची स्फूर्ती ज्यांच्याकडून मिळाली, ते मा. राजन राजे हे खरंतर, सर्व कामगारांना गुरुस्थानी आहेत. त्यातच सोमवार, दि. ३ जुलै-२०२३ रोजी संपन्न झालेल्या, गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून, श्री. दत्तात्रय मुरबाडे यांनी, 'धर्मराज्य पक्षा'च्या नावे गुरुदक्षिणा स्वरुपात, २५ हजारांचा धनादेश, आपल्या गुरुंच्या हाती सुपूर्द केला.** संघर्षात निष्ठा आणि सातत्य असले की, प्रस्थापितांनाही सर्वसामान्यांसमोर झुकावेच लागते... आणि, अशा मुजोर व्यवस्थापनाला सनदशीरमार्गाने नमते घ्यायला भाग पाडून, आपल्या न्याय्य-हक्काच्या लढाईत यशस्वी होणे, यापेक्षा आणखी दुसरी गुरुदक्षिणा तरी काय असणार !!!



'आम आदमी पक्षा'चे (आप) महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष, श्री. धनंजय शिंदे यांनी नुकतीच, 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची, त्यांच्या ठाणे येथील कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. यावेळी देशातील राजकीय आणि सामाजिक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. दरम्यान, मणिपूर हिंसाचार, मराठी-माणसांमधील राजकीय ग्लानी, कंत्राटी कामगार-पद्धत, वाढती महागाई-बेरोजगारी आणि आगामी निवडणुकांसंदर्भात, मा. राजन राजे यांनी, आपली परखड भूमिका मांडली..**जोपर्यंत कुठला राजकीय पक्ष, 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता'स्वरुप असलेल्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'चं निर्मूलन करण्याचं (केवळ शासकीय-सेवेतील नव्हे; तर, संपूर्ण खाजगी कॉर्पोरेटीय उद्योग-सेवा क्षेत्रातील), नष्ट करण्याचं अभिवचन देत नाही व सत्तेवर येताच त्याची अंमलबजावणी करीत नाही जे भांडवली-आर्थिक सत्तेला व 'कंपनी-दहशतवादा'ला** (Corporate-Terrorism) **आव्हान देण्याचं धोरण-विशेष, आजवर कुठल्याही 'प्रस्थापित राजकीय पक्षा'ने अवलंबलेलं नाहीच; तोवर, तो खऱ्या अर्थाने जनहितवादी, लोकशाहीवादी, समतावादी, समाजवादी नाहीच**... असं राजन राजे यांनी ठाम प्रतिपादन केलं!

त्याला पप्पू म्हणणं, ही फेकूंची निव्वळ बदमाषी होती की, सत्ताप्राप्तीसाठी होती जनतेच्या डोळ्यात फेकलेली धूळ?

सत्तेच्या उदरातली एकदाची उतरवून सरंजामी झूल...तो मग उठलाच,
...आणि, बुद्ध-महात्म्यासारखा सत्याच्या मार्गावर सरळसोट चालायला लागला,
पहाता पहाता देश पादाक्रांत झाला कधि, कुणा समजलं काही?

५६'' 'छाती'ला खुलं आव्हान, ५२ व्या वर्षी देश अवघा जिंकता झाला...
...आणि आता, कर्नाटक नंतर विविध राज्याराज्यांतून अध्येमध्ये आणि २०२४ मध्ये, तो आपल्याला चारणारच धूळ...
हे एकदा निश्चित झाल्यावर बनावट-बोगस हिंदुत्ववाद्यांची पिसाळलेली औलाद,
विनाशकाले विपरीत बुद्धीनुसार विनाशकारीपथावर उलटी चालायला लागलीय...

हो, तेच तर त्यांच्या संतापाचं-वैफल्याचं मूळ!
संविधानिक संस्थांची एव्हाना झालेली संस्थानं...
विद्वेषाचा महापूर, जळतं मणिपूर...
भडकती महागाई, त्यावर अर्धरोजगारी-बेरोजगारीचा फणा!
खाजगीकरणातून देश लुटतायत मित्र-भांडवलदार...पण, त्याची पर्वा कुणा?

देश तर केव्हाचाच विकून झालाय हो...
आता तयारी,
देशाचा 'आत्मा' कायमचा विकृत करुन... मगच सत्तेतून पायउतार होण्याची!
तोंड काळं करुन अंदमानला काळ्या पाण्यावर जाण्याची...!!!

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

# चल चल रे गड्या, हो तू पुढे.....

*भरत देशासी आज पडती धर्मविद्वेषाचे तडे,*
*पुसले सांगा कुणी अपुल्या राज्यघटनेचे धडे!*

*'अंधभक्ति'तूनिया अमृतकाळी पाऊल पुढचे, मागे का हो पडे?*
*चल चल रे गड्या, हो तू पुढे.....*

*महागाई-बेकारीचे उंच उंच सामोरी उभे असती रे कडे,*
*सत्र आत्महत्येचं जरी, रोज श्रमिकवर्गाचं त्यातूनिया घडे...*

*नृशंस 'त्यांच्या', मुखातला करुणेस्तव घास सांगा कधि तो अडे?*
*चल चल रे गड्या, हो तू पुढे.....*

*वस्त्यावस्त्यांतून हात हाती मिळवूनिया टाळू रक्ताचे सडे...*
*नको दंगल, भविष्य मंगल 'नफ़रत छोड़ो, भारत जोड़ो'तूनी घडे...*
*चल चल रे गड्या, हो तू पुढे.....*

*नंगानाच तो हुकूम'शहां'चा, विद्वेषाचे विकृत दर्शन रोज निरंतर घडे...*
*देशभरातल्या भ्रष्टाचाऱ्यांचे 'ईडी' पीडेतून उभे करती 'ते' कडे...*
*चल चल रे गड्या, हो तू पुढे.....*

*ढासळती बुरुज, पायी तुडवले जरी लोकशाहीचे मढे,*
*द्वेषमुक्तीच्या अभियानातून उभे करुया,*
*अभिमानाने 'लोकशाही'चे पुनरपि अत्युच्च पर्वतकडे...*

*चल चल रे 'राहुल' गड्या, हो तू पुढे...!!!*

***...राजन राजे** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*







गुरुपौर्णिमा













*'धर्मराज्य पक्ष' व' धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे संस्थापक अध्यक्ष मा. राजन राजे यांना, गुरुपौर्णिमेनिमित्त शुभेच्छा देण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी, ठाणे कार्यालयात कार्यकर्ते, पदाधिकारी व कामगार सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते. यावेळी नवी मुंबईतील सुल्झर पंप्स्, इडीकॉन, प्रोटेगो, सॅन्डोज, एक्सल होन, मुरबाड येथील फॅब्टेक वर्क्स, वसई येथील स्टेलमेक लिमिटेड कंपन्यांतील कामगार सदस्यांनी मा. राजन राजे यांची भेट घेऊन, त्यांचे शुभाशिर्वाद घेतले. दरम्यान, सद्यस्थितीत मोदी-शाह यांच्या माध्यमातून 'भाजपा'ई केंद्र सरकारपुरस्कृत येऊ घातलेल्या काळ्या कायद्यांमुळे कामगार-जगताची होणारी वाताहत आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीमुळे उध्वस्त होणारा भूमिपुत्र कामगार याची भीषणता त्यांनी, यावेळी विषद केली. मुजोरी कंपनी व्यवस्थापन व राजकीय व्यवस्था यांच्या अभद्र युतीमुळेच, आज कामगार देशोधडीला लागलाय, या कामगारद्रोही प्रवृत्तींविरोधात लढा देण्यासाठी, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' ही एकमेव कामगार संघटनाच, प्रस्थापितांविरोधात संघर्ष करीत असल्यामुळेच, काही प्रमाणात का असेना; पण, कामगार स्वाभिमानाने जगतोय, असेही मा. राजन राजे यांनी, उपस्थित कामगार सदस्यांशी बोलताना शेवटी स्पष्ट केले.*

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at**, Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)